महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

# पक्षिमित्र

▪ वर्ष बारावे ▪ अंक १ ला ▪ संपादक : दिगंबर गाडगीळ ▪ १ ऑक्टोबर २०२१ ▪ पाने –२४



## संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**

३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

**सहाय्यक संपादक**

**श्री. अनिल माळी,** नाशिक, मो. ९८५०८१८६४४

Email: anilrmali@yahoo.co.in

**श्री. किरण मोरे,** अमरावती, मो. ९९२३९१००३४

Email: kiranmorey1983@gmail.com

### कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे,** ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे,** अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे,** सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | – | **श्री. अनिल माळी,** नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | – | **प्रा. निनाद शाह,** सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | – | **श्री. रोहन भाटे,** कराड (सातारा)<br>**मो. ९४२२००४८००** |
| सदस्य | – | **श्री. सचिन मेन,** पालघर<br>**मो. ८४४६२४८८८४** |
| सदस्य | – | **श्री. अनिल महाजन,** वरणगाव–जळगाव<br>**मो. ८८०६१९८०४०** |

### सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| **श्री. भाऊ काटदरे** | **(चिपळूण)** | **मो. ९४२३८३१७००** |
| **श्री. दिगांबर गाडगीळ** | **(नाशिक)** | **मो. ९८८१०७९७११** |
| **डॉ. दिलीप यार्दी** | **(औरंगाबाद)** | **मो. ९४२२७०४२२१** |
| **डॉ. अनिल पिंपळापुरे** | **(नागपुर)** | **मो. ९८८१७१३४६६** |
| **श्री. बापुसाहेब भोसले** | **(अहमदनगर)** | **मो.९८२२६३३१३३** |


# संपादकीय

## अमेरिकेतील वॉशिंग्टन आणि मृत पक्षी




**दिगंबर गाडगीळ**

संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक

dgadgil09@gmail.com


जगातील अनेक देशांतील तज्ज्ञ ठराविक काळाने भेटत असतात. हवामानबदल, पर्यावरण याबद्दल चर्चा करतात. ठराविक काळात जागतिक तपमानवाढीला रोखण्यासाठी काही संकल्प जाहिर करतात. पण घडतं का तसं? उलट जितक्या वर्षांनी तपमानातील वाढ रोखू असं जाहिर करतात त्याच्या आधीच ते वाढलेलं असतं. इतक्या वर्षांत इतके इंधन ज्वलत कमी करू असं म्हणतात. तसं होतं का? काही राष्ट्रांना आपण प्रदूषणात भर घालत आहोत हे मान्यच नसतं.

जागतिक तपमानवाढीचा अंदाज होता त्याच्या आधीच तपमान वाढलं. काही वर्षांपासूनच अंटार्क्टिका खंडातील बर्फ वितळू लागलं आहे. समुद्र पातळी त्यामुळे अत्यल्प प्रमाणात का होईना वाढू लागली आहे. अंटार्टिकावरील बर्फकडे कोसळत असल्याची दृश्य बघायला मिळत आहेत. गेले वर्ष हे सगळ्यात उष्ण वर्ष होतं, हे जाहीर झालं आहे. कसं थांबवाल हे सारं? पूर्वीची चैन आता गरज वाटू लागली आहे. विकास, आणखी विकास अशी ओढ लागली आहे. पण विकास करील भकास याची जाणीव तीव्र होत नाही.

प्लॅस्टिकचा भस्मासूर थैमान घालू लागला आहे. जमिनीवरचे प्लॅस्टिकचे थर समुद्रात घरंगळू लागले आहेत. जलचरांच्या पोटात ते प्लॅस्टिक शिरत आहे. कुत्रे, गायींच्या पोटातील प्लॅस्टिकचे थर बाहेर काढावे लागत आहे; पण प्लॅस्टिकचा खप वाढतोच आहे. प्लॅस्टिकवरच्या बंदीची चर्चा सुरू होऊन किती वर्षेझाली; पण बेकारी वाढेल या धास्तीने त्याला कोणी हात घालत नाही. उलट ऑनलाईन वस्तू विक्री करता प्लॅस्टिचं लपेटणं वाढतच आहे. प्लॅस्टिकच्या पातळ पिशव्या वापरण्यावर बंदी घालण्याची भाषा सुरू होऊन वर्षे उलटली. आता कुठे केंद्र सरकारने पुढील वर्षाच्या जुलैपासून त्याचे उत्पादन बंद करण्याची घोषणा केली आहे.

हवामान बदलामुळे पर्जन्यमान बदलले आहे. हिमालय ठिसूळ आहे. तेथे लॅण्डस्लाईड अटळ आहे म्हणता भक्कम अशा सह्याद्रीत कडे कोसळू लागले आहे. पूर्वी नद्यांना पूर येत होते; पण शेतेच्या शेते वाहून जात नव्हती. कोकणात पाऊस कोसळत होता; पण तो प्रलयकारी नसायचा. आता तिथे ढगफुटी होऊ लागली आहे. 'आप मेलं जग बुडालं' ही वृत्ती टाकून पुढच्या पिढ्यांचे विश्वस्त या नात्यानं काही तरी भक्कम करावं लागणार आहे. कठोर व्हावं लागणार आहे.

*****

**❊ मुखपृष्ठ ❊**

हिवाळा सुरू झाला की आपल्या देशात अनेक पक्षी प्रजाती स्थलांतर करून येत असतात. यामध्ये विशेष करून उत्तरेकडील भागातून येणारे पट्टकदंब हे हिमालय ओलांडून येत असतात. मुखपृष्ठावर विविध स्थलांतरित पक्षी एकत्रितपणे दर्शविली आहेत.

अंक व मुखपृष्ठ सजावट – श्री. सौरभ जवंजाळ

**मुखपृष्ठ छायाचित्र – कु. योगीता मानका, श्री. मनोज बिंड, शशांक नगराळे, अमेय ठाकरे, समिश डोंगळे,**

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

मागील वर्षी कोरोनाच्या कडक लॉकडाऊन दरम्यान महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे वेबिनारचे मालिकेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये नामवंत पक्षी तज्ञ आणि पक्षी अभ्यासक आणि काही नवोदित व्याख्यात्यांच्या लागोपाठ २५ वेबिनारचे आयोजन या मालिकेत करण्यात आले होते. या संपूर्ण मालिकेस संपूर्ण राज्यातून तथा राज्य बाहेरून सुद्धा उत्कृष्ट प्रतिसाद लाभला होता. त्यानंतर अशा आणखी वेबिनारची मागणी बघता ऑगस्ट २०२१ पासून ही मालिका पुन्हा सुरु करण्यात आली. आता दर सोमवारी सायंकाळी ७ वाजता, ही या वेबिनारची वेळ असून यामध्ये सप्टेंबर अखेर पर्यंत आठ व्याख्याने पार पडली आहेत. यामध्ये जेष्ठ पक्षी अभ्यासक श्री. गोपाळराव ठोसर, महाराष्ट्र पक्षिमित्रचे मार्गदर्शक डॉ. अनिल पिंपळापुरे, डॉ. राजू कसंबे, श्री. अनिल माळी, अमोल सावंत, डॉ. सुजित नरवाडे, प्रा. डॉ. गणेश मर्गज आणि संजय गायकवाड यांची व्याख्याने पार पडलीत. यामध्ये श्री. गोपाळराव ठोसर आणि डॉ. सुजित नरवाडे यांनी माळरान परीसंस्था आणि माळढोक व तनमोर या नष्टप्राय पक्ष्यांची सध्यस्थिती मांडली. यावरून माळरान हे अधिवास किती प्रचंड संकटात आहेत आणि आजवर त्याची किती वाताहत झाली याची सर्वांना कल्पना आली. माळढोक व तनमोर या पक्ष्यांना वाचविण्यासाठी सर्वप्रथम त्यांचे अधिवास म्हणजेच गवताळ माळराने वाचली पाहिजेत आणि ते काम आज किती कठीण झाले आहे असा एकंदरीत सूर या वेबिणार नंतर उमटला. माळरानावरील एकूणच पक्ष्यांची स्थिती चिंताग्रस्त आहे, त्यांचे संवर्धन करण्यासाठी नेमकेपणाने काय करता येईल ? याचे उत्तर आज कुणाकडेच नाही. त्यासाठी सर्वच स्थरावर विचारमंथन आवश्यक आहे.

मराठी पक्षी विश्वकोश किंवा पक्षीकोश प्रकल्प याबाबत अलीकडे आपण ऐकले असेलच. आपल्याला माहिती आहे की आज रोजी मराठी भाषेमध्ये पक्षांविषयी बरीच पुस्तके उपलब्ध आहेत. यामध्ये काही फिल्ड गाईड स्वरूपाची, काही एका पक्षावर तर काही अनेक पक्षांची माहिती असलेल्या पुस्तकांचा समावेश आहे. आदरणीय मारुती चितमपल्ली यांचे पक्षिकोश हे पुस्तक मराठीतील एक अनमोल खजिनाच. यामध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक पक्ष्याची थोडक्यात माहिती आणि विविध प्रांतातील आणि भाषेतील त्यांची नावं दिलेली असुन, हा ग्रंथ पक्षी माहितीचा महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ आहे. परंतु महाराष्ट्रातील प्रत्येक पक्ष्याची Wikipedia प्रमाणे माहिती असलेले एक पुस्तक असावे असे गोंदिया येथील अप्पर जिल्हाधिकारी श्री. राजेश खवले यांनी संकल्पना मांडली.त्यांच्या संकल्पनेतून, अनेक सहकाऱ्यांचे मदतीने मराठी पक्षी विश्वकोश साकारण्यासाठी सुरुवात झाली आहे. या प्रकल्पास सर्वतोपरी मदत करण्यासाठी अनेक जण पुढे येत आहेत. यामध्ये प्रत्येक पक्ष्यावर लिहीण्याची तयारी अनेक पक्षिमित्र, अभ्यासक यांनी दर्शविली आहे. या प्रकल्पास महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे अनेक सभासद सुद्धा सहकार्य करणार असुन सर्वांच्या सहकार्यानेच हा प्रकल्प पुर्णत्वास जाणार आहे.

BNHS आणि महाराष्ट्र पक्षिमीत्र ने २०१६ मध्ये प्रकाशित केलेल्या ''महाराष्ट्रातील पक्ष्यांची मराठी भाषेतील प्रमाण नावे'' या पुस्तिकेतील यादीनुसार महाराष्ट्रात एकुण ५७७ प्रजातीचे पक्षी आढळून येतात. या यादीला प्रमाण मानून प्रत्येक पक्षाविषयी सविस्तर माहिती देणारा पक्षीकोश मराठीतून तयार करणे हे या प्रकल्पाचे उदिष्ट आहे. हा विश्वकोश एकापेक्षा अधिक खंडामध्ये प्रकाशित केला जाईल. या पक्षीकोशा मध्ये ज्यांचा ज्या पक्षाबाबत अभ्यास किंवा निरिक्षण असेल अशांनी त्या त्या पक्षावर लिहीने अपेक्षित आहे. त्यानुसार पक्षी लेख लिहीण्याची जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. आतापर्यंत यामध्ये लिहीण्यासाठी अनेकांनी तयारी दर्शवली असून आपणही या प्रकल्पामध्ये सहभागी होऊन आपला अभ्यास असलेल्या, किंवा आपल्याला माहिती असलेल्या पक्ष्यावर लेख लिहावा असे आवाहन मी आपणास करीत आहे.

महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे दरवर्षी जीवन गौरव पुरस्कार, पक्षी

संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार, पक्षी संशोधन पुरस्कार व पक्षी जनजागृती पुरस्कार असे एकूण चार पुरस्कार देण्यात येत असतात. हे पुरस्कार दरवर्षी नियमितपणे दिले जावेत यासाठी दान दात्यांकडून एकरक्कमी दान निधी साठी आवाहन करण्यात आले होते, त्यानुसार आतापर्यंत जीवन गौरव पुरस्कारासाठी डॉ. अनिल पिंपळापुरे नागपूर यांचे पुढाकारातून विदर्भ पक्षिमित्र मंच, यांचे कडून रु. ८५,५००/– इतका निधी प्राप्त झाला. पक्षिमित्र जनजागृती पुरस्कारा करिता श्री. अविनाश धों. शिरोडे, नाशिक यांचेकडून रु. ५००००/– इतका निधी प्राप्त झाला तसेच पक्षिमित्र पक्षीसंशोधन पुरस्कारा करिता स्व.डॉ.जी.एन.व्ही. मेमोरियल मेडल फंड तर्फे डॉ. जयंत वडतकर आणि प्रा. डॉ. गजानन वाघ यांचे पुढाकारातून रु. ४५१००/– इतका निधी प्राप्त झाला. सदर रक्कमेच्या व्याजातून दरवर्षी हे पुरस्कार दिले जातील. याशिवाय पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार या पुरस्कारासाठी सुद्धा किमान प्रत्येकी रु. ५००००/– इतका निधी आवश्यक आहे. त्यासाठी दान दात्यांनी पुढे येऊन दान निधी दिल्यास सर्वच पुरस्कार नियमितपणे दिले जातील.

महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळीस चाळीस वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्याने २०२१ हे वर्ष महाराष्ट्र पक्षिमित्र कडून चार दशकपूर्ती वर्ष म्हणून साजरे केले गेले. या निमित्याने जानेवारी २०२२ चा पक्षिमित्र अंक हा चार दशकपूर्ती स्मरणिका स्वरुपात काढण्याचा मानस आहे. या अंकात चार दशकातील वाटचालीचा आढावा घेणारे जेष्टांचे लेख यामध्ये असणार आहेत. हा अंक रंगीत आणि माहितीपूर्ण असा काढण्याचा मानस असल्याने त्यास आर्थिक पाठबळाची आवश्यकता भासणार आहे. तरी त्यासाठी आपल्याकडून जर आर्थिक मदत प्राप्त झाली तर हा संग्रही असावा असा अंक प्रकाशित करणे शक्य होणार आहे. तरी यासाठी आपण जाहिरात स्वरुपात किंवा देणगी स्वरुपात आर्थिक सहकार्य करावे ही विनंती. याबाबात सविस्तर माहिती अंकात देण्यात आलेली आहे.

पुढील नोव्हेंबर महिना म्हणजे पक्षी सप्ताहाचा. महाराष्ट्र पक्षिमित्र कडून गेली पाच वर्षे साजरा केला जाणारा पक्षी सप्ताह शासन स्तरावरून सुद्धा साजरा केला जावा यासाठी महाराष्ट्र वन विभाग तथा शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जात होता. या आपल्या मागणीस मंजुरी मिळून त्याचा शासन निर्णय मागील वर्षीच्या पक्षी सप्ताहापूर्वी दि. २६ ऑक्टोबर २०२० ला प्रसिद्ध झाला. त्यानुसार मागील वर्षी ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या दरम्यान संपूर्ण राज्यात यावर्षीचा पक्षी सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. या वर्षी सुद्धा हा सप्ताह आपण सर्वांनी मिळून उत्साहात साजरा करू या. यामध्ये शासनाचा वन विभाग, वन्यजीव विभाग आणि इतर विभाग यांना सहकार्य करून प्रत्येक गाव, तालुका व जिल्हा पातळीवर तो साजरा केला जावा अशी आपणास विनंती आहे.

या काळात संस्थेसाठी एक दुखाची बातमी आली ती म्हणजे वर्धा येथील बहार नेचर फाउंडेशन या संस्थेचे नवनिर्वाचित सचिव तथा महाराष्ट्र पक्षिमित्रचे आजीवन सभासद, तरुण पक्षी अभ्यासक वैभव देशमुख यांचे अल्पशा आजाराने दुखद निधन झाले. त्यांच्या निधनाने एक अभ्यासू पक्षीमित्रास आपण मुकलो आहे. महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे वैभव देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

यापूर्वी कोरोणा परिस्थितीमुळे दोनदा स्थगित झालेले सोलापूर येथे होणारे ३४ वे संमेलन बहुतेक दिवाळी नंतर आयोजित करण्याचा मानस आहे. परिस्थिती बघून पुढील तारीख ठरविण्यात येईल. कोरोना काळात सर्वांनी काळजी घ्यावी ही विनंती.

*****

# इस्त्रायलमधील कावळे, राघू आणि भारतीय गाढवे



**डॉ. राजू कसंबे**
सहायक संचालक-शिक्षण,
बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई.
मोबाइल: ९००४९२४७३१.

२००९ मध्ये मला पक्षी स्थलांतराच्या अभ्यासाचे तंत्र शिकण्यासाठी इस्त्रायलला (त्यांच्या शब्दात - इजराईल) जाण्याचा योग आला. ह्या अभ्यास दौऱ्यादरम्यान आलेल्या तीन रंजक अनुभवांबद्दल येथे मी लिहिणार आहे. माझा मुक्काम इस्त्रायलच्या दक्षिण किनाऱ्यावर समुद्राकाठी वसलेल्या ईलात ह्या सुंदर शहरात होता. माझ्या सोबत माझे पी.एचडी.चे मार्गदर्शक डॉ. प्रवीण चरडे होते. ते नागपूरच्या सेवादल महिला महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. खरे तर, त्यांच्याच पुढाकाराने हा अभ्यास दौरा घडून आला होता. या ठिकाणी मूळ भारतीय वंशाच्या प्रो. रुवेन योसेफ (आपल्याकडे ह्याचा उच्चार रुबेन जोसेफ असा करतात) ह्या जगप्रसिद्ध पक्षिशास्त्रज्ञाने इंटरनॅशनल बर्ड रिसर्च सेंटर (IBRC) स्थापन केले असून या ठिकाणी त्यांची चमू गेल्या अनेक दशकांपासून पक्ष्यांच्या स्थलांतराचा अभ्यास करते आहे. त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील गाजलेला रॉलेक्स पुरस्कार सुद्धा मिळालेला आहे. रुवेन सर मुंबईत जन्माला आलेले बेने इजराईली/ ज्यू असून विशेष म्हणजे त्यांना गोड मराठी बोलता येतं!

दररोज सकाळी ठीक सहा वाजता आम्ही इंटरनॅशनल बर्ड रिसर्च सेंटरला जात असू. त्याकरिता आम्हाला घ्यायला सेंटरची गाडी येत असे. तेथे पोहोचल्यानंतर आम्ही पक्ष्यांना पकडून त्यांच्या पायात विशिष्ट क्रमांक असलेले कडे (रिंग) टाकून मोजमापे घेत असू आणि लागलीच त्याला मुक्त करीत असू. पक्षी पकडण्यासाठी ह्या ठिकाणच्या वाळवंटातील झुडूपी जंगलात अनेक कायम स्वरूपी फासे (बर्ड ट्रॅप) लावलेले आहेत. तसेच पक्षी पकडण्याच्या जाळ्या (मिस्टनेट) दररोज सकाळी उभारल्या जातात. ह्या जाळ्या कोळी लोक मासेमारीसाठी उपयोगात आणतात तशा प्रकारच्या, म्हणजे रंगहीन आणि अगदीच पातळ धाग्याच्या बनवलेल्या असतात. त्यामुळे त्या एकदा काठ्यांवर उभारल्या की पक्ष्यांना अगदीच दिसून येत नाहीत आणि उडताना पक्षी आपसूकच त्यात फसतात. अशा फसलेल्या पक्ष्यांना जाळीतून हळुवारपणे काढणे हीसुद्धा एक कला असल्याचे शिकायला मिळाले.त्यावेळेस आपल्या संशोधनामधील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आणि केंद्रबिंदू 'पक्षी' असतो हे लक्षात ठेवणे जरूरी असते. पक्षी स्थलांतराच्या विविध अभ्यास तंत्रांचे प्रशिक्षण घ्यायला आम्ही येथे आलो होतो. त्याच वेळेस ह्या ठिकाणी पोलंडचा एक युवक, फ्रांसची एक युवती व मंगोलियाचा पक्षितज्ज्ञ प्रा. गोंबोबातर सुद्धा आलेले होते.

**घुसखोर कावळ्यांची पिल्लं**

दुसऱ्या दिवसी सेंटरवरील दोन तंत्रज्ञ (झादोक आणि इव्हान) गैरहजर असल्याचे आढळून आले. पण ते काहीतरी 'मिशन'वर गेल्याचे कळले. दुपारी सेंटरची गाडी आणि हे तंत्रज्ञ परतले. सोबत दोन छोट्या डब्यात त्यांनी कावळ्यांची पिल्लं पकडून आणली होती.डबा उघडताच पिल्लांनी खाऊसाठी चोची उघडल्या आणि खाऊ मागण्याचा आर्जवी आवाज करायला लागले. त्यांच्या चोचीमधला भडक लाल नारिंगी रंग सुंदर असतो.

पक्ष्यांच्या पिल्लं नेहेमीच अधाशी असल्यासारखी असतात. कारण त्यांची वाढ झटपट होते. मला वाटले पिल्लं घरट्यातून खाली पडली असतील आणि ह्यांनी त्यांना वाचवून आणले असेल. पण रुवेनसरांनी नंतर आम्हाला सगळी माहिती सांगितली. कावळे इस्त्रायल तसेच मध्यपूर्वेतील इतर देशात भारतातून जहाजांवर प्रवास करून पोहोचले. हळूहळू त्यांचा इथे जम बसला आणि संख्या वाढत गेली. कावळे पक्ष्यांमधील सर्वात चतुर प्रजाती होय. स्वभावतःच ते आक्रमक आणि मिश्रहारी असतात. म्हणजे मिळेल ते खाऊन ते जगू शकतात. कत्तलखाने, कचरा टाकण्याच्या जागा (डंपिंग ग्राउंड), तसेच गलीच्छ वस्त्यात राहायला त्यांना आवडते. ते आक्रमक होऊन स्वतःच्या घरट्याचे रक्षण करतात. इस्त्रायलला घुसखोर (Invasive species) म्हणून आलेले कावळे चांगलेच मुजोर झाले. आता ते स्थानिक पक्ष्यांची अंडी-पिल्लं पळवू लागले. आधीच वाळवंटात फार कमी पक्षी प्रजाती टिकाव धरतात.त्यांच्यावर आलेले हे 'कावळेरुपी' विदेशी अस्मानी संकट त्यांची संख्या कमी करायला कारणीभूत ठरले.रुवेन साहेब आणि त्यांच्या चमूच्या संशोधनातून हे उघड झाले. मग त्यांनी 'कावळे उच्चाटन मोहीम' राबविण्याचे ठरविले. सुरुवातीला त्यांनी छऱ्याच्या

बंदुकीने (एअरगन) कावळ्यांना टिपणे सुरु केले. काहीच दिवसात कावळ्यांनी सेंटरची गाडी आणि कर्मचारी लक्ष्यात ठेऊन ते दिसताच आरडाओरडा करायला सुरुवात केली. सर्व कावळे बंदुकीच्या मारा करण्याच्या क्षमतेपेक्षा अधिक वर उंचावर उडायला लागले. बंदुकीसारखे शस्त्र कावळ्यांच्या चतुराईसमोर फेल ठरले.

मग शास्त्रज्ञांनी कावळ्यांची घरटी शोधून ती नष्ट करायला सुरुवात केली. त्यासाठी उंच क्रेनच्या सहाय्याने झाडावरचे घरटे नष्ट केले जात असे. हळूहळू कावळ्यांच्या हे लक्ष्यात आले. आता कावळे क्रेनच्या आवाक्यापेक्षा जास्त उंचीवरच्या फांदीवर घरटी करू लागले. घरटे नष्ट करायची कल्पना सुद्धा फेल होते असे वाटत असतानाच शास्त्रज्ञांनी असे ठरवले की ज्या झाडावर कावळ्याने खूप उंचावर घरटे बांधले आहे त्या झाडाचा शेंडाच उडवून टाकायचा आणि कावळ्याची पिल्लं मारून टाकायची. संपूर्ण ईलात शहरात राबविली गेलेली ही मोहीम यशस्वी होणार असे वाटत होते. आता शहरात कावळ्याचे एकही घरटे दिसत नव्हते.दिसले की कसेही करून संपवले जात होते. मग, मजेदार गोष्ट अशी की इस्त्रायलमध्ये अजूनही भरपूर कावळे आहेत, दिसत होते. त्याचे कारण काय असावे बरे?

रात्री रुवेन साहेबांच्या घरी जेवायला जात असताना त्यांनी उंचावरून पलीकडे दिसणारी रोषणाई दाखविली. मला वाटले इस्त्रायलमधील दुसरे एखादे शहर असेल. पण, ते जॉर्डन मधील अकाबा हे मोठे शहर होते. अगदी काही किलोमीटर अंतरावर हे शहर आहे. तर, कावळ्यांनी काय केले की रात्री झोपायला आणि घरटी करायला ते जॉर्डनला जातात (म्हणजे आपल्या दृष्टीने दुसऱ्या देशात) आणि दिवस उजाडला की ईलातमध्ये पोटापाण्याचे बघायला येतात. अधूनमधून एखादे कावळ्याचे जोडपे ईलातमध्ये घरटे करून बघते. जागरूक नागरिक त्याची तक्रार करतात. मग शास्त्रज्ञ घरटे तोडून त्यातील कावळ्याची पिल्लं काढून आणतात आणि एका बंद डब्यात मरण्यासाठी टाकून देतात. तेच आम्ही बघत होतो. शास्त्रज्ञांनी चतुर कावळ्यांचे उच्चाटन करायचा केलेला प्रयत्न कसा अयशस्वी झाला त्याचेच हे उदाहरण. कावळ्यांची संख्या कमी करायची असेल तर आपल्या परिसरातील उपलब्ध खाद्य कमी करावे लागते (त्यांना खाऊ घालणे, कचरा व्यवस्थापन, खरकटे न टाकणे, स्वच्छ कत्तलखाने, मांसाची दुकाने स्वच्छ ठेवणे इ.). घरटी नष्ट करून, झाडे तोडून वा त्यांना बंदुकीने मारून आपण कधीही त्यांच्यावर नियंत्रण मिळवू शकत नाही हेच खरे आहे.

**शेती, मधमाशा आणि राघू पक्षी**

आम्हाला एका शेतात नेण्यात आले. त्या शेतात तसेच आजूबाजूच्या प्रदेशात मका तसेच सूर्यफुलाची लागवड केलेली होती. शेताच्या एका बाजूस मोठ्या पेट्या ठेवलेल्या होत्या. अर्थात त्यात मधमाशा पाळलेल्या होत्या(मधुमक्षिकापालन). ह्या मधमाशा शेतातील सूर्यफुलांचे परागीकरण घडवून आणतात व त्यामुळे उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होते. ह्या मधमाशांच्या पेट्या महाग असतात आणि विकत घ्यायला लागतात.

मग आमचे येथे काय काम होते? ह्या शेतातील मधमाशांचा इस्त्रायलवरून स्थलांतर करणाऱ्या राघूंच्या थव्याला सुगावा लागला होता. दक्षिणेकडून (आफ्रिकेतून) उत्तरेकडे (अर्थात युरोपकडे) परतीच्या प्रवासाला निघलेल्या युरोपियन राघूच्या (यूरोपियन बी-ईटर) थव्याने आराम आणि उदरभरणासाठी (Feeding and resting stopover) येथेच मुक्काम ठोकला होता. जसे आपण थकलो की एखाद्या धाब्यावर थांबतो ना तसेच!

आता ह्या राघूंनी शेतात पाळलेल्या मधमाशांचा फन्ना उडवायला सुरुवात केली. हतबल शेतकऱ्याने मग राघू पक्ष्यांना पकडण्यासाठी इंटरनॅशनल बर्ड रिसर्च सेंटरला कळवले. म्हणून मग आम्ही पक्षी पकडण्यासाठीच्या मिस्टनेट सोबत घेऊन येथे पोचलो होतो. लोखंडी सळया मधमाशांच्या पेट्यांशेजारी गाडून त्याला मिस्टनेट्स लावल्या. आम्ही मागे होताच मधमाशा पकडायला झेपावणारे राघू मिस्टनेटमध्ये अडकू लागले. दोन तीन पक्षी अडकले की आम्ही ते पक्षी काढून कापडी पिशवीत जमवायला सुरुवात केली. शंभरावर राघू पकडून झाल्यानंतर आम्ही मिस्टनेट्स गुंडाळल्या आणि पक्षी घेऊन सेंटरला परत आलो. परतताना मक्याच्या गोड कणसाचा आस्वाद घ्यायला आम्ही विसरलो नाही!

पक्ष्यांना रिंगिंग करून तेथेच सोडले असते तर परत त्यांनी मधमाशा संपवल्या असत्या. अशा प्रवासी पक्ष्यांना रिंगिंग करून विशिष्ट अंतरापर्यंत उत्तरेला सोडले तर ते त्याच शेतात लगेच परत येतात. पण जसजसे आपण अंतर वाढवत जाऊ तसतसे त्यांचे परत येण्याचे प्रमाण घटत जाते. पुढे एका विशिष्ट अंतरानंतर मात्र एकही पक्षी परत येत नाही. म्हणजे त्या पक्ष्यांना 'आपण आपल्या प्रवासात खूप पुढे आलोय त्यामुळे आता त्याच शेतात परत (मागे) जायला

परवडणार नाही'हे निश्चितच कळत असावे. अशा प्रकारचा संशोधन निबंध रुवेन सरांनी प्रकाशित केल्याचे सांगितले.

मला पडलेला प्रश्न म्हणजे 'पक्षी पकडून शेतकऱ्यांचे नुकसान वाचविण्यात सेंटरचा काय फायदा?' त्यात दोन फायदे आहेत. एक म्हणजे पक्ष्यांना रिंगिंग केले जाते. पुढील वर्षी परत तेच पक्षी त्याच शेतात येतात का ते कळते, त्यांच्या स्थलांतराबद्दल माहिती मिळविता येते. दुसरे म्हणजे मधमाशांना वाचविल्यामुळे शेतातील उत्पन्नाचे नुकसान घटते. त्याचा मोबदला म्हणून शेतकरी राघू पक्ष्यांना पकडून दूर सोडण्यासाठी पैसे देतो! अशाप्रकारे सगळ्यांचा फायदा होतो. आपल्याकडे महत्त्वाची गोष्ट अशी की राघू शेतातील किडे खातात म्हणून शेती उपयोगी पक्षी मानला जातो. त्यात तो शेती उपयोगी मधमाशा किती खातो आणि नुकसान करणारे कीटक किती खातो हेही आपण बघायला हवे! मला नेहेमी असे वाटते की राघू पक्षी शेतीचे नुकसान करणाऱ्या कीटकांपेक्षा शेतीउपयोगी कीटकच अधिक खात असावेत.

**इस्रायलमधील भारतीय गाढवे**

त्या सूर्यफूलाच्या शेतातून युरोपियन राघू (बी-ईटर) पक्षी पकडून परत निघालो तेव्हा रस्त्याने खजुराची बाग दिसली. तिकडे झादोकनी कार थांबविली. इस्रायल खरे म्हणजे वाळवंट. तंत्रज्ञानाचा उपयोग करून तेथील जहाल देशभक्तांनी अथक व कठोर परिश्रम घेऊन त्याचे नंदनवन केले आहे. ह्या बागेत ठिबक सिंचनाचा चतुराईने उपयोग करून केवळ झाडाच्या बुंध्याजवळ पाणी पुरविलेले होते. मलेशियन तसेच बांगलादेशी मुस्लिम मजूर येथे शेतातील कामे करतात असे कळले (हे मजूर स्वस्तात मिळतात म्हणे).

खजुराच्या बागेत दोन-चार गाढवे चरताना दिसली. विचारणा केली असता कळले की ती भारतीय गाढवे आहेत. मला इस्रायलमध्ये 'भारतीय' शब्द ऐकून मनस्वी आनंद झाला. इथेही कुणीतरी 'भारतीय' आहे असे उगाच वाटले. ती गाढवे निवांतपणे गवत खात होती. त्यांना इथे कुणी ओझे वाहायला लावत नसतील असेही वाटून गेले. तेव्हा रुवेन सरांनी त्यावर प्रकाश टाकला.

ही गाढवे भारतातून आणली गेली ती केवळ गवत खाण्यासाठी आणि प्रजोत्पादन करण्यासाठी. म्हणजे असे की ठिबक सिंचनामुळे खजुराच्या बुंध्याजवळ गवत वाढते. ते जर काढले नाही तर संपूर्ण पाणी गवतच शोषून घेणार. वाळवंटात पाण्याचे महत्त्व व मूल्य फार असते हे सांगायची गरज नसावी. गाढवांचे काम म्हणजे ते गवत खाणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे. गवत काढायला मजूर ठेवणे फार महाग पडते. त्यापेक्षा गाढवाची एक जोडी विकत घेऊन ठेवायला परवडते. ती एकदाची गुंतवणूक असते.गाढवे बागेतले गवत नियंत्रित तर करतातच, सोबतच त्यांना पिल्लं पण होतात. ही पिल्लं विकून परत बक्कळ पैसे मिळतात.गाढवांची लीद (शेण) त्याच बागेत खत म्हणून वापरतात. हे बोनस. अच्छा, एक व्यक्त करायचेच राहिले. इथली गाढवे भारतातल्या गाढवापेक्षा सुखी वाटली! उगाच फुकटची हमाली करून रात्री उकिरडे फुंकायचे काम ते करीत नाहीत!

बागेच्या कुंपणाजवळ जाऊन फोटो काढायला गेलो तर सर बोलले, ''अरे तुला तुझ्या इंडियन ब्रदर सोबत फोटो काढायचा आहे का?''

भारतीय वंशाच्या गाढवांचा मला एवढा अभिमान यापूर्वी कधीच वाटला नव्हता. त्यामुळे अर्थातच 'इस गधेके साथ एक फोटो तो बनताही है' असे मनात म्हणत मी स्वतःचा फोटो काढून घेतला (तेव्हा सेल्फीची क्रेझ नव्हती, नाहीतर सेल्फीच काढली असती)! फ्रेममध्ये निवांतपणे चरणारी गाढवे दिसतील ह्याची खातरजमा करून घेतली.

वाळवंटातून उत्कृष्ट प्रतीचे खजूर भारतात आयात केले जातात हे माहीत होते. पण त्यामागे भारतीय गाढवांचे असलेले असे निवांत 'योगदान' मला माहीत नव्हते. आता ते आयात केलेले उत्कृष्ट प्रतीचे खजूर मला आणखी गोड वाटायला लागले आहेत!





# एक गोष्ट



**अंजू वैद्य,**
नागपूर

गेल्या महिन्याभरापासून पोर्चमधल्या कृत्रिम घरट्यात चिमणा चिमणीचा संसार आहे. दिवस निघाला की लगबग सुरू पिलांना भरवण्याची. मिनिटा मिनिटाला चिमणीचे येणं जाणं सुरू आहे. यावर मात्र लक्ष ठेवून आहे शिक्रा. चार पाच दिवसांच्या आधी ही शिक्रा ऋशारश्रश नेहमीप्रमाणे भक्ष्य शोधत होती. चिमणा घरट्यावर बसलेला असताना तिचे लक्ष गेले याच्याकडे आणि चिमण्याची पंढरी घाबरली. उडून जायच्या नादात खिडकीच्या काचेवर आदळला. पाय वर करून निपचित पडून होता. वाटले संपली आता याची गाथा. पाणी शिंपडणार इतक्यात उडून गेला आणि शिक्रा आपल्या नेहमीच्याच इलेक्ट्रीक पोलवर बसून यालाच बघत होती. घाबरलेला चिमणा दुसऱ्या दिवशीच दिसला घरट्याकडे.

तीच शिक्रा आज परत आली चिमणा परत धडकला खिडकीच्या काचेला. आवाज आला म्हणून आम्ही पोर्चमध्ये बघतोय तर चिमणा खिडकीत उताणा पडलेला आणि शिक्रा पोर्चमध्येच उडत आलेली. आम्हाला बघून तिला सुचले नसावे काहीच. तीही घाबरून पोलवर जाऊन बसली पण लक्ष सगळे चिमण्याकडेच. मान वळवून वळवून बघत होती. तिची शिकार तिला हवी होती. त्यासाठी तिला आमच्या उपस्थितीचीही फिकीर नव्हती. सारखी शोधाशोध सुरू होती. दोनवेळा पोलवरून उडून लगतच्या खिडकीतही जाऊन बसली. (आणि मला अगदी तीन चार फुटावरून बघायला मिळाली. तिला कदाचित खात्री होती की चिमणा मरून पडलाय आणि तो मिळवायला तिची धडपड सुरू होती. मात्र पडलेला चिमणा तिला दिसत नव्हता तसा तो आम्हाला पण दिसत नव्हता. चिमणा कुठे गायब झाला याच विचारात असताना चिमणी आली चोचीत खूप साऱ्या अळ्या घेऊन. काय घडले तिला माहीत नसल्याने ती सरळ घरट्याजवळ गेली, मात्र लगेचच थबकली, दोनच सेकंद. पिल्लांना खाऊ घालू की नको विचार करत घुटमळली. नंतर घरट्यात घुसली. तीरासारखी बाहेर पडत शिक्राच्या समोरून उडत गेली.

समोरच्या इमारतीवर बुलबुल जोडी होती ती लगेचच तारेवर बसलेल्या शिक्राला हुसकावून लावण्यासाठी सज्ज झाली. विचित्र आवाज करून, हल्ला केल्यासारखे करून दोघेही शिक्रावर भिडले पण शिक्राला काही एक फरक पडला नाही. मला नवल वाटले दोन्ही बुलबुलांच्या धाडसाचे. शिकार होऊ शकत होते तेही पण शिक्रा त्यांना बघत पण नव्हती. चिमणी परत पिल्लांचा पौष्टिक आहार घेऊन घरट्यात आली. परत जाताना शिक्राच्या अगदी जवळून उडत गेली तशी शिक्राही तिच्याच मागे झेपावली. वाटले चिमणी पण संपलीच आज. तेवढ्यात चिमणा आमच्या मागून खिडकीच्या बाजूला ठेवलेल्या कांद्याच्या पोत्याआडून उडी घेऊन बाहेर पडला. जखमी झाला होता कदाचित आणि खूप घाबरला होता. त्यानंतर खूप वेळ भयाण शांतता होती. आता घरट्यातील पिल्लांचे कसे होणार हा विचार मनात आला आणि चिमणी पुन्हा अळ्या घेऊन आली. (ही खुशी वेगळीच होती). तिने हुलकावणी दिली होती शिक्राला. घरट्या पासून दूर केले होते खाऊ की गिळू करणाऱ्या संकटाला. पिल्लांना वाचवताना आईचे धाडस खूप वेगळे असते. कशी जीवाच्या आकांताने उडत गेली असेल ती शिक्राला मागे टाकताना. खूप वेळानंतर चिमणाही आला चोचीत खूप अळ्या घेऊन. आपल्या पिल्लांना सांगायला की आहे रे तुमचा बाप जीवंत..

*****

# शबल



**राघवेंद्र वंजारी,राहुल वंजारी**
सोलापूर

काळा पांढरा हे विरोधी रंग असले तरी ते एकमेकांना पूरक आहेत. जसे काळ्या फळ्यावर पांढरा खडू, पांढऱ्या कागदावर काळी शाई, निरभ्र अंतराळात चकाकणारे नक्षत्र तसे पक्षी जगतात शबल. शरीरयष्टी नाजूक,सुबक, रानात एका नजरेत ओळखता येणारा VARIABLE WHEATEAR (Oenanthe picata)

शबल हा एक उघड्या व गवताळ माळरानावर राहणारा पक्षी आहे. शबल हा गप्पीदास, रणागोजा कुळातील या कुटुंबातील पक्षी असून लांबीला दयाळ इतका असतो. हा बलुचीस्थान व बाल्टिक प्रदेशातून भारतात येतो. बऱ्याच वर्षांनी हा पक्षी सोलापूरच्या गंगेवाडी प्रदेशात आढळला. हिवाळ्याच्या अखेरीस याचे दर्शन घडले.

उत्तर सोलापूर तालुक्यात माळराने व गवताळ प्रदेश विखुरलेले आहेत. गंगेवाडी गावठाण सभोवतालचा प्रदेश जैवविविधतेने नटलेला भूभाग आहे. गवताच्या असंख्य प्रजातींनी आच्छादलेला, सस्तन प्राणी, सरपटणारे जीव, उभयचर, विविध कुळातील पक्षी तसेच अनेक कीटकांचे वास्तव येथे आहे. पक्षी बाभळीच्या झाडावर ३-५ फुटांवर बसायचा. तो जास्त वेळ बेसाल्टच्या बांधावर बसलेला असायचा. याची हालचाल जलद होती. सकाळी दुपारी किंवा सायंकाळी निरीक्षणे घेताना दिसले की हा पक्षी एका ठिकाणी जास्त वेळ स्थिरावत नाही. झुडपावरून दगडावर, दगडावरून जमिनीवर. जमिनीवर अन्न टिपणे पुन्हा झुडपावर जाऊन बसणे. ढाल-किडे, टोळ, घोडे, पतंग, कोळी आणि अळ्या यावर गुजराण करतो.

शबलचा वावर सोलापूर मध्ये नोव्हेंबर ते मार्च या दरम्यान असतो. हा पक्षी इतर पक्षी प्रजातींच्या समूहामध्ये पाहण्यात आला आहे. उदा. गप्पीदास, चंडोल, टिटवी, दयाळ, यांच्या समवेत आढळलेला आहे.





*****

# माझ्या अंगणातील पक्षी वैभव



**अनिल भगीरथ जोशी**
सोलापूर
९४०४२९५५०९

मी गेल्या १५ वर्षांपासून माझ्या घराच्या अंगणात पक्ष्यांसाठी स्वच्छ पाण्याची व धान्याची सोय स्वतंत्र पात्रात करत आलो आहे. अंगणात अनेक ठिकाणी पाण्याने भरलेली मातीची भांडी दर २-३ दिवसांनी बदलतो. तसेच धान्य पात्रात कचरा पडला असेल तर ते साफ करून घेतो. माझा नित्य दिनक्रमच असा आहे, उठल्याबरोबर दात घासत अंगणात फेरफटका मारतो आणि पात्राची पाहणी करून घेतो. माझ्या अंगणातील वैभव. पुढीलप्रमाणे- कोकिळा, भारद्वाज, राखी धनेश, चिमणी, डव्ह, वटवट्या, सनबर्ड, मुनिया, बाया व्हिव्हर, ग्रीन बी ईटर, बुलबुल, रॉबिन, पोपट, खार, मुंगुस, मांजर, साप इत्यादी.

आमची झोप उडविण्यासाठी पहाटेच कोकीळ मंजुळ आवाज करत अंगणातील अंजीराच्या झाडावर येऊन बसतात. कधी १ तर कधी ५-६ ची त्यांची संख्या असते. नर-मादी दोन्हीही असतात. अंजीर खाऊन झाले की, कधीकधी झाडावरून उतरून पाणी पात्रातून पाणी पित बराच वेळ बसतात. यांच्या गोड आवाजाने सर्व परिसर मंत्रमुग्ध होतो. राखी धनेश हा जोडीने येतो. खास करून अंजीर खाण्यासाठी येतात. हे आल्यानंतर आधी गच्चीवर किंवा बाजूच्या नारळाच्या झाडावर बसतात. आवाज करत राहतात नंतर मग अंजीराकडे वळतात. हे दिवसातून २ वेळा सकाळी व संध्याकाळी येतात. कोकीळ मात्र ३-४ वेळा येतात. राखी धनेश बऱ्याच वेळा कोकिळसोबतच अंजीर खातात. दोन भारद्वाज केवळ पाणी पिण्यासाठी सकाळी-दुपारी येतात. पाणी पिऊन बाजूच्या नारळाच्या झाडावर जाऊन बसतात व आवाज करत राहतात. दुपारी ३ वाजेच्या सुमारास हमखास माझ्या अंगणात पाणी पिण्यास आले की, अर्धा तास असतात.

मी अंगणातील झाडांवर तसेच घराच्या दुसऱ्या मजल्याच्या खिडक्यांमध्ये कृत्रिम घरटी बांधून ठेवलेली आहेत. या घरट्यांचा सर्वात जास्त फायदा चिमण्यांनी घेतला आणि घेत आहेत. आजवर जवळपास चिमण्यांची ७० पिल्ले या कृत्रिम घरट्यांमध्ये जन्मली. साधारण ३-४ पिल्लं ८-१० दिवसांची झालेली असताना अंगणातच दगावली. एकदा तर एक पिल्लू १५ दिवसांचे झाले होते. परंतु त्याला अजून उडता येत नव्हते. त्याच्याबरोबर जन्मलेली इतर पिल्लं उडून गेली होती. परंतु या पिल्लाला अन्न भरवायला त्याची आई सारखी यायची. एकदा मी रात्री पहिलं, पिल्लू छानसं झोपलं होतं. सकाळी पाहिलं तर त्या पिल्लाला भरपूर लाल मुंग्या लागल्या होत्या. अक्षरश: डोळ्यात पाणी आलं. आजही अंगणात १०-१२ चिमण्यांची जोडपी येतात, पाणी पितात, अंघोळ करतात आणि येता-जाता धान्य टिपत राहतात. दिवसभर त्यांचा चिचिवाट सुरूच असतो.

दोन लाफिंग डव्ह नेहमी धान्य खाण्यासाठी अंगणात येतात. राखी वटवट्या फक्त पाणी पिण्यासाठी येतात. सनबर्ड या झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारत असतात आणि पाणी पिऊन जातात. दिवसातून अनेक वेळा येतात. अंगणातील झाडावर घरटेसुद्धा सनबर्ड बनवते. तीन वर्षांपूर्वी जोरदार वाऱ्यासह पाऊस आला त्यावेळी सनबर्डने बेलाच्या झाडावर बनवलेले घरटे पडले. त्यातील अंडेसुद्धा खाली पडले आणि फुटले. याआधी कधी असे झाले नाही. एका झाडाला बायाने केलेली ४ घरटी ५-६ वर्षांपासून आहेत. घरटे रिकामे असल्याने त्यामध्ये सिल्व्हर बील आपले पिल्लं देत आहेत. साधारणत: ४ वर्षेझाली. तसेच जे घरटे रिकामे असते त्याच्या काड्या सनबर्ड व चिमण्या काढून घेऊन जात असतात स्वत:च्या घरांसाठी. नेहमी असं सुरू असतं.

पावसाळा सुरू झाला की सुरुवातीला २-४ मुनिया येतात आणि हळूहळू करत त्यांची संख्या ३५-४० च्या घरात जाते. धान्य खाण्यासाठीच या येतात. दरवर्षी न चुकता येतात. मुनिया येतात याच दरम्यान बाया साधारण १२-१५ यासुद्धा येतात. हे दोन्ही पक्षी संपूर्ण पावसाळा संपेपर्यंत दिवसभर असतात. बाया दिवसभर आवाज करत असतात. बाया ज्या पात्रात बसून धान्य टिपतात तिथे मुनियांना बसू देत नाहीत. मग ते दुसऱ्या पात्रांकडे जातात. चिमण्या मात्र बायाबरोबर धान्य टिपण्याचा आनंद घेतात.

अंगणात, पोर्चवरती पोपटांसाठी मका (कणिस) बांधून ठेवत असतो. ते खाण्यासाठी ८-१० पोपट रोज येत असतात. अंगणात आले की, इतरत्र बसतात आणि आवाज करत राहतात. मग थोड्या वेळाने मक्यावर ताव मारत राहतात. सकाळी ६ ते १० दरम्यान आणि दुपारी ४ ते ६ दरम्यानही पोपट येतात. अनेवेळा यांच्या समवेत खारसुद्धा मक्यावर ताव मात असतात. बुलबुल अंजीर खाऊन, पाणी पिऊन जातात. काही वेळा बुलबुलने अंगणात पिल्लही दिली. ग्रीन बी ईटर अंगणातील विविध किडे खाण्यासाठी येतात. उलट-सुलट गिरक्या घेत बरोबर किडे पकडतात. रॉबिन पक्षीसुद्धा येतो आणि पाणी पिऊन जातो. अधून-मधून शिक्रा पक्षी येतो आणि अंगणातील झाडावर बसून निरीक्षण करून जातो. अनेक वेळा मुंगुस येऊन फेरफटका मारून जातात. कधी एक तर २-३ असतात. घराजवळ लाकडाचे अड्डे आहेत. तिथेही भरपूर मुंगुस असतात. बिस्किटे दिली तर ते खातात. आल्यानंतर अर्धा तास तरी अंगणात असतात. एकदा एका मुंगुसाने जन्मलेल्या मांजरीच्या पिल्लाची मान पकडली. वडिलांनी काठीने मुंगुसाला मारलं. परंतु त्याने पिल्लू सोडले नाही. येथे फिरणाऱ्या २-३ मांजरींनी २५-३० पिल्लं इथं जन्माला घातली. माझ्यासमोरच १५ वर्षांमध्ये मांजरीने १ पोपट पकडला आणि २ मुनिया फस्त केले. त्यावेळी मला असं वाटलं की, उगीच पक्ष्यांसाठी धान्य ठेवलं. मी मांजरीवर सारखं लक्ष ठेवून राहतो.

*****

## आवाहन
## पक्षिमित्र : ४ दशकपूर्ती विशेषांक

महाराष्ट्रात आजपासून सुमारे ४० वर्षापूर्वी **महाराष्ट्र पक्षिमित्र** नावाने एक चळवळ सुरु झाली जी चळवळ येत्या १० जानेवारी २०२२ ला चार दशके पूर्ण करीत आहे. मागील वर्ष आपण ४ **दशकपूर्ती वर्ष** म्हणून साजरे केले. गेल्या चाळीस वर्षात राज्याच्या कानाकोपऱ्यात झालेले ३३ राज्यस्तरीय पक्षिमित्र संमेलने आणि ३० हून अधिक विभागीय पक्षिमित्र संमेलनातून ही चळवळ गावागावात पोहोचली. संस्थेच्या या वाटचालीत आणि तिला लोकाभिमुख करण्यासाठी आजवर अनेकांचे योगदान लाभले असून जेष्ठ मंडळीने लावलेले हे रोपटे आज एका मोठ्या वटवृक्षात रुपांतरीत झाले आहे. आज संस्थेचे १३०० आजीवन सभासद असून संस्थेचे मुखपत्र **पक्षिमित्र** हे त्रैमासिक सभासदांना व वेबसाईटच्या माध्यमातून अनेकांपर्यंत पोहोचत असते. या पक्षिमित्र अंकाच्या आणि संमेलनाच्या माध्यमातून आज तरुण मंडळी, अभ्यासक, संशोधक आणि पक्षी छायाचित्रकार संस्थेसोबत जुळत आहेत. या चळवळीतून आजवर अनेक पक्षिमित्र, वन्यजीव अभ्यासक व संवर्धक निर्माण झालेत.

महाराष्ट्र पक्षिमित्रच्या चार दशकपूर्ती वर्षा निमित्त येत्या १ जानेवारी २०२२ चा **पक्षिमित्र** चा अंक हा ४ दशकपूर्ती विशेषांक स्वरुपात प्रकाशित करण्याचा मानस आहे. या अंकात या पक्षिमित्र चळवळीच्या चार दशकांचा आढावा घेणारे जेष्ठ मंडळींचे लेख, चळवळीची उपलब्धी आणि ऐतिहासिक आठवणींना उजाळा देणाऱ्या छायाचित्रांचा संग्रह प्रकाशित केला जाणार आहे. सदर अंक हा रंगीत स्वरुपात छापला जाणार असल्याने यासाठी खर्च सुद्धा जास्त येणार आहे. त्यामुळे या अंकाच्या खर्चासाठी छपाई साठी किमान १ ते १.५ लक्ष इतका निधी आवश्यक आहे. हा निधी जाहिरात, अंक निधी व सहयोग शुल्क या माध्यमातून मिळणे अपेक्षित आहे.

### जाहिरात दर


- **कव्हर मागील बाजू** – १२०००/–
- **कव्हर आतील बाजू** – ८०००/–
- **पूर्ण पेज (रंगीत)** – ६०००/–
- **पूर्ण पेज (कृष्णधवल)** – ३०००/–
- **अर्ध पेज (रंगीत)** – ३०००/–
- **अर्ध पेज (कृष्णधवल)** – २०००/–

अंकनिधी – १०००/– (देणगी देणाऱ्यांची नावे पत्ता/हुद्द्यासह प्रकाशित केले जातील)
सहयोग शुल्क (आजीवन सभासदांसाठी) १५०/–
(सहयोग शुल्क देणाऱ्या सभासदांना अंक पोस्टाने पाठविला जाईल)
आपली सहयोग राशी / जाहिरात शुल्क / अंक निधी महाराष्ट्र पक्षिमित्रच्या खात्यात जमा करून जाहिरातीचा नमुना आणि पैसे पाठविल्याची माहिती खालील इमेल वर पाठवावी

Account Name - **Maharashtra Pakshimitra**
Account number - **60036812017**
IFSC Code - **M-HB0000639**
Bank Name - **Bank of Maharashtra,** Gadgenagar Branch, Amravati
Email: **pakshimitragmail.com**

* अधिक माहितीसाठी संपर्क *
9822875773, 9822204070,
9923910034, 9689383940

# सारस सुरस कथा



**प्राचार्य डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**
मानद वन्यजीव रक्षक
अहमदनगर.
sudhakarkurhade@gmail.com

**सारसा:कृष्णवर्णास्तु श्वेतरक्तांकनैर्युता: ।**
**पक्षयोर्वक्षसि भृशं क्षुद्रनासापुटा मता:।।**

'हंसदेवाने' आपल्या मृगपक्षिशास्त्र या ग्रंथात 'सारस' पक्ष्याचे असे यथार्थ वर्णन केलेले दिसून येते. या ग्रंथाशिवाय शुक्रनीतीसार कल्पद्रुकोश, अभि. चिंतामणी, धन्वन्तरि आदी संस्कृत ग्रंथांमधूनही क्रौंच पक्ष्याचे आणि सारस क्रौचाचे अनेक वर्णनात्मक संदर्भ आढळून येतात. अनेक संस्कृत-प्राकृत ग्रंथांमध्ये आणि ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये पशू-पक्ष्यांचे विविधांगी संदर्भ समोर येतातच. या सर्वच ग्रंथांमधून 'सारस क्रौंच' या पक्ष्याविषयी सखोल टिपा-टिप्पणी केलेली पहावयास मिळते. यातून एक गोष्ट स्पष्टपणे अधोरेखित होते ती म्हणजे 'सारस' या पक्ष्याने हजारो वर्षांपासून भारतीय जनमानसात स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

सतराव्या शतकाच्या सुरुवातीस मुगल सम्राट जहांगीर याने सारस पक्ष्याचे संवर्धन केल्याची नोंद आहे. निसर्गाप्रती प्रेम, आदर असल्याने या सम्राटाने सारस पक्ष्यांचे प्रणयाराधन, त्यांचा नाच,वीण, घरटे, खाण्याच्या सवयी यांचे निरीक्षण करून तत्संबंधी नोंदी करून ठेवलेल्या आहेत. सम्राट जहांगीर हे बहुधा पहिलेच असावेत ज्यांनी 'सारस' दोनच अंडी घालतात (वा दोन अंड्यांमध्ये ४८ तासांचे अंतर असते) आणि त्यांना उबविण्याचा कालावधी हा ३४ दिवसांचा असतो, अशा काही महत्त्वपूर्ण नोंदी सतराव्या शतकातच करून ठेवल्या आहेत.

बौद्ध वाङ्मयातदेखील भगवान बुद्धांनी लुंबीनी क्षेत्रात सारस क्रौंच पक्ष्याची हत्या झालेली पाहिल्याचे दाखले आहेत. भारतवंशियांनी पूर्वपरंपरापार या पक्ष्याचे संगोपन, संवर्धन केलेले असले तरी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी केवळ हौस/मौज म्हणून सारसची शिकार केल्याचीही उदाहरणे आहेत.

जगभरात आढळणाऱ्या १५ क्रौच प्रजातींपैकी सहा प्रजाती भारतात आढळून येतात. 'सारस' हा यापैकीच एक. उत्तर प्रदेशचा राज्यपक्षी म्हणून मान्यता प्राप्त असलेला 'सारस' महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजराथ, राजस्थान आणि ईशान्य भारतातही आढळून येतो. गुजराथमधील तीन वेगवेगळ्या प्रवासांदरम्यान शेतात आणि गवताळ प्रदेशात हा पक्षी जवळून पाहण्याची संधी मला लाभली. महाराष्ट्र पक्षीमित्रचे संस्थापक, पक्षितज्ज्ञ स्व. प्रकाश गोळे यांनी इ.स. १९८९ साली प्रथमच भारतातील सारस पक्ष्यांचे सर्व्हेक्षण करून त्यांच्या अधिवासांची नोंद घेतली होती. १९९९ साली डेहराडूनस्थित 'भारतीय वन्यजीव संस्थान' या संस्थेनेही 'सारस क्रौंच गणना' हाती घेतली होती. या अहवालानुसार संपूर्ण भारतात १९९१ सारस (प्रौढ + पिले) मोजण्यात आली. पैकी सर्वाधिक संख्या उत्तर प्रदेशमध्ये दिसून आली. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात सहा सारस आढळून आले होते आणि या सारसांना मोठ्या प्रमाणात धोका असल्याचेही अहवालात स्पष्ट नोंदविण्यात आले होते. अगदी अलीकडे १३ जून ते १९ जून २०२१ दरम्यान भंडारा, गोंदिया आणि बालाघाट जिल्ह्यात नव्याने करण्यात आलेल्या 'सारस पक्षी गणनेत' ८८ पक्षी आढळले असले तरीही त्यांचे अस्तित्व धोक्यात असल्याचेही नमूद केले आहे.

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम: शाश्वती: समा ।**
**यत् क्रौंचमिथुनादेकमवधी: काममोहितम् ।।**

प्रणयक्रीडेत मग्न असलेल्या क्रौंच पक्ष्यांच्या जोडीतील एका पक्ष्याच्या जिव्हारी जेव्हा निषादाचा बाण लागला, त्यासमयी तेथे उपस्थित असलेल्या वाल्मिकी ऋषींच्या तोंडून हा श्लोक बाहेर पडला, त्यांनी निषादाला शापच दिला, 'हे निषादा, काममोहीत झालेल्या क्रौंच युगुलाचा तू नाश केलास, तुझेही अस्तित्व या भूमीवर फार काळ राहणार नाही.' हा प्रसंग 'तमसा' नदी किनारी घडल्याचे रामायणात वर्णन आहे. तात्पर्य 'सारस'हा रामायण काळापासूनच जनमानसात प्रेम, आदरभाव मिळवून असलेला जनमान्य, राजमान्य पक्षी होय.

महाराष्ट्र पक्षीमित्रच्या अनेक संमेलनांमधून गोंदिया परिसरातील पक्षिमित्रांनी आपली सारस विषयीची निरीक्षणे

वेळोवेळी मांडली आहेत. या पक्ष्याचे संवर्धन करता यावे म्हणून गोंदिया परिसरात जेथे सारस घरटी करतात ती शेतजमीनच विकत घेण्यासाठी आम्ही 'सारस संवर्धन निधी'देखील उभारला होता. परंतु ते काही शक्य झाले नाही. असा सर्वच पक्षिमित्रांच्या मनात भरलेला, हृदयस्थ असलेला हा 'सारस'.

उत्तर भारत, मध्य भारत आणि नेपाळ हा मुख्य अधिवास असलेला 'सारस' पाकिस्तान आणि बांगलादेशामध्येही तुरळक प्रमाणावर दिसतो. हिमालयातील धर्मशाळा आणि काश्मीरमधील ३५०० फूट उंचीवरदेखील सारस आढळून येतो. त्याचप्रमाणे थारचे वाळवंट आणि कच्छच्या रणातही याचे वास्तव्य दिसून आले आहे. राजस्थानातील जोधपूर, गुजरातमधील सुरत आणि वलसाड, हरियाणातील हिस्सार, उत्तर प्रदेशातील अलाहाबाद, मध्य प्रदेशातील रेवा, छत्रपूर, ग्वाल्हेर आणि महाराष्ट्रातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर या जिल्ह्यात सारस पक्ष्यांची आजवर नोंद घेण्यात आली आहे.

पाऊस आणि अवर्णन यावर अवलंबून हा पक्षी आपल्या मूळ अधिवासाचे जवळपासच स्थलांतर करतो. सारस हा क्रौंच कुळातला सर्वात मोठा क्रौंच सुमारे दीड मीटर उंचीचा, जगातील सर्वात मोठा उडणारा पक्षी असेही त्याचे वर्णन करतात. लांबसडक, शिडशिडीत, गुलाबी पाय, उंच मान आणि मस्तकाच्या मागील भागावर, गळ्याच्या वरच्या भागावर असलेल्या लालभडक पिसांमुळे हा पक्षी अधिकच सौंदर्यपूर्ण दिसतो. पाठ, पोट आणि पंखांवर राखाडी निळसर (खापराच्या पाटीसारखी) पिसे असतात. मात्र शेपटीकडील पिसे पांढरी असतात. शरीराच्या मानाने चोच लहानशी असून करड्या रंगाची दिसते. इतर क्रौंचासारखेच सारसही उडताना ताठ मान सरळ पुढे करून आणि पाय एका रेषेत मागे ठेवून उडतात. तुतारीसारखा, उच्चस्तरातील आवाज हे क्रौंच पक्ष्यांचे वैशिष्ट्य. हा आवाज उडताना, जमिनीवर फिरताना अथवा प्रणयक्रीडेच्या वेळीही काढतात.

मुळातच स्वभावाने धीट आणि कणखर असलेला हा पक्षी मानवी वस्त्यांच्या जवळपासच शेतजमिनी, गवताळ रानांमध्ये हमखास दिसतो. शेतांमध्ये काम करणाऱ्या माणसांच्या अवती-भवती, वाहतूक असणाऱ्या रस्त्यांच्या कडेलाही हे पक्षी फिरताना, खाद्य शोधताना दिसून येतात. (मी गुजरात, राजस्थान सहलींदरम्यान रस्त्याच्या कडेलाच सारस पाहिले आहेत.) सारस क्रौंच हा नेहमीच जोडीने वावरताना दिसतो. काही वेळेस तर चांगली मोठी झालेली एक-दोन पिल्लेही त्यांच्यासोबत असतात.

जोडी जमल्यानंतर प्रणयराधना करणारे नर-मादी आपल्या घरट्यासाठी सीमाक्षेत्र ठरवितात. या क्षेत्रात दुसरा सारस अतिक्रमण करताना लक्षात आल्यास स्वत:चे लांब-रुंद पंख पसरवत आणि तीव्र कर्कश्य आवाज करत हे युगुल नवीन पक्ष्याला हुसकावून लावते. उथळ पाणथळींमध्ये आणि शेतांमध्ये/गवताळ रानात सारस दिसून येतो. मिश्रहारी असलेला हा पक्षी नाकतोडे, इतर कीटक, लहान जलचर आणि पाणवनस्पतींवर ताव मारतो. इतर



पक्ष्यांची अंडी, कासवाची अंडी, साप, बकी कासव यांचाही सासरच्या भक्ष्यात समावेश आहे. तांदळाच्या/धानच्या उभ्या शेतातील धान्य/दाणे सारस खात नाही तर कापणीनंतर शिल्लक राहिलेले, खाली पडलेले तांदळाचे दाणे ते खातात. याच कारणांमुळे शेतकरी सारस पक्ष्यांना 'पिकांचा शत्रू' समजत नाही.

सारसाचे प्रियराधन हा एक नेत्रदीपक सोहळाच असतो. प्रियराधना करणारी जोडी आकाशाकडे मान उंचावत गळ्यातून तीव्र स्वर काढत आपले विशाल पंख पसरवत पक्षी निरीक्षकांचेही लक्ष वेधून घेतात. . जुलै ते ऑक्टोबर (म्हणजे पावसाळा) हा त्यांचा

भारतातील विणीचा काळ. भात खाचरांमध्ये अथवा दलदलीमध्ये सारस मोठ्या आकाराचे घरटे बांधतो. यासाठी ते पाणवनस्पतींच्या आणि इतर वनस्पतींच्या काटक्या वापरतात. सुमारे मीटरभर उंचीचे आणि रुंदीचे हे घरटे तराफ्याप्रमाणे पाण्याच्या पृष्ठभागावर आल्याने स्पष्टपणे दिसून येते. एक जोडी हेच घरटे दुरुस्ती करून अनेक वर्षेवापरताना दिसून आले आहे. साधारणपणे मादी एक किंवा दोन (क्वचित प्रसंगी तीन किंवा चार) अंडी घालते. नर आणि मादी दोघेही अंडी उबविण्याचे काम चार ते पाच आठवड्यांपर्यंत करतात. मातकट दुधाळ रंगाची अंडी चार इंच लांब, अडीच इंच रुंद आणि सुमारे २४० ग्रॅम वजनाची असतात. अंड्यातून पिलू बाहेर आल्यानंतर त्याचे कवच दूर नेऊन टाकले जाते अथवा प्रौढ पक्षी ते खाऊन टाकतात. सुरुवातीचे काही दिवस आई-बाबा पिल्लांना भरवतात. परंतु त्यानंतर मात्र पिल्ले स्वत: खायला लागतात. धोक्याचा इशारा मिळताच पिल्ले स्वत:ला लपवून घेतात. सुमारे तीन महिन्यांचे होईपर्यंत पिल्ले आपल्या जन्मदात्यांसमेतच राहतात. सारसाच्या घरट्याला, अंड्याला पिल्लांना अनेक शत्रू असल्याने त्यांच्या संख्येवर बंधने येतात. शेतात वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशकांमुळेही विषबाधेने सारसांच्या मृत्यूच्या घटना समोर आल्या आहेत. याचबरोबर उच्चदाबाच्या वीज वाहक तारांना धडकूनही हे पक्षी दगावल्याच्या नोंदी आहेत.

भारतामध्ये सारसांची संख्या १५,००० च्या आसपास असून नैसर्गिक पाणथळींच्या ठिकाणी त्यांची संख्या अधिक असल्याचेही नोंदविण्यात आले आहे. 'आययूसीएन, रेड डेटा बुक'नुसार सारस पक्ष्यांची नोंद 'संवेदनशील प्रजाती' म्हणून करण्यात आली असली तरी जागतिक पातळीवर ही प्रजाती 'संकटग्रस्त' म्हणून घोषित करण्यात आली आहे. शिवाय भारतीय वन्यजीव (संरक्षण) कायदा १९७२ नुसार शेड्यूल चार अंतर्गत याचा समावेश करण्यात आला आहे.

मानवी वस्तीच्या जवळ, मानवाचा सहकारी म्हणून ओळख असलेला हा देखणा पक्षी सांभाळण्यासाठी, त्याचे निसर्गातील स्थान अबाधित ठेवण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न होणे क्रमप्राप्त आहे.

*****

## स्वागत नवीन सभासदांचे

(दि.१ एप्रिल २०२१ ते ३० जून २०२१)

| क्र | नाव | गाव | फोन न. | ई.मेल |
|---|---|---|---|---|
| १२८८ | डॉ. गजेंद्र ल. निकम | बुलढाणा | 9423057563 | zen5684@gmail.com |
| १२८९ | श्री संजय म. कोमपलवार | नांदेड | 9423209956 | sanjaykompalwar@gmail.com |
| १२९० | डॉ. वैभव सु. माहोरे | अमरावती | 9511891152 | drvaibhavmahore25@gmail.com |
| १२९१ | डॉ. कु. आकांक्षा दि.पोतदार | सोलापूर | 9503316141 | akankshapotdar1419@gmail.com |
| १२९२ | श्री. भारत द. गावंडे | बारामती | 9822557850 | bharatgawade26@gmail.com |
| १२९३ | श्री. शशांक ज. नगराळे | अमरावती | 9960010860 | shashanag@gmail.com |
| १२९४ | श्री. राजकुमार जा. डोंगरे | नाशिक | 8600177774 | rajkumardongare@gmail.com |
| १२९५ | श्री. सचिन पंधारे | बेंगळूरू | 9845667304 | sachinpandhare@gmail.com |
| १२९६ | श्री. अमूल्य दे. पंडीत | पुणे | 9822393814 | amulyapandit58@gmail.com |
| १२९७ | डॉ. राहुल भागवत | वडोदरा | 9227132501 | savewildlife74@gmail.com |

# अलिबाग किनारा: स्थलांतरित पक्ष्यांचे आश्रयस्थान



**डॉ. पूनम निर्मलकुमार कुर्वे,**
विभाग प्रमुख, जैवविविधता वन्यजीव विभाग,
वि. प्र. म. चे बा. ना. बांदोडकर महाविद्यालय, ठाणे

पक्ष्यांचे स्थलांतर हा नेहमीच एक कुतूहलाचा विषय राहिला आहे. पक्षीनिरीक्षक, छायाचित्रकार, विद्यार्थी, शिक्षक, इत्यादी सर्वच जण या गोष्टीने अचंबित असतात. बदलणाऱ्या हवामानानुसार विशिष्ट ऋतूंमध्ये हे पक्षी हजारो मैलांचा प्रवास करून दुसऱ्या देशातल्या एखाद्या विवक्षित ठिकाणी पोहोचतात. ठरलेला ऋतू संपताच पुन्हा तेवढाच प्रवास करून ते परत मायदेशी परततात.

**हे पक्षी स्थलांतर का करतात?**

या पक्ष्यांचे सर्वसाधारण अन्न मृदुकाय प्राणी, संधिपाद प्राणी, त्यांची अंडी व अळ्यां हे असते. अतिशय शीत ऋतूत कीटकांची व पर्यायाने अळ्यांची संख्या खूप कमी होते तसेच, पाण्याचे बर्फात रूपांतर झाल्यामुळे मासेही मिळणे अशक्य होते व पक्ष्यांना अन्न मिळविणे कठीण होते. शिवाय पराकोटीच्या थंड हवामानात यांच्या पिल्लांचे जगणेही अवघड असते. म्हणून हिवाळ्यात हे पक्षी व त्यांची पिल्ले लांबचा प्रवास करून दक्षिण गोलार्धातील तुलनेने उष्ण प्रदेशात पोहोचतात. इथे त्यांचे अन्न किडे, अळ्या, छोटे मासे व इतर समुद्र किनाऱ्यावरील प्राणी उपलब्ध असल्यामुळे ते हिवाळा संपेपर्यंत इथे राहतात, मोठे होतात व जननयोग्य वयात त्यांच्या मूळ प्रदेशात परततात. उत्तर अमेरिकेतील बऱ्याच पक्ष्यांचे मूळ दक्षिणेतील प्रदेशात असल्याचे पुरावे या सिद्धांताची पुष्टी करतात

या प्रवासाचे अंतर, मार्ग व दिशा ठरलेली असतात. थोडेफार बदल सोडता या सर्व बाबी सुनिश्चित असतात. या छोट्याशा दूतांना दिशा, अंतर, मार्ग यांचे ज्ञान कसे होते हाही शास्त्रज्ञांसाठी एक संशोधनाचा विषय राहिला आहे.

भारत देशही अशा कित्येक स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांचे आश्रयस्थान आहे. भारताच्या अनेक राज्यांपैकी महाराष्ट्र हे राज्य त्यातील जंगले व समुद्र किनारे यामुळे उपरोल्लेखित बऱ्याच पक्ष्यांना आसरा देते. महाराष्ट्राला सुमारे १२२ किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा ही निसर्गदत्त देणगी आहे. कोकण किनाऱ्यापैकी अलिबाग व जवळपासचे समुद्र किनारे हा आत्ताच्या अभ्यासाचा विषय आहे.

अलिबाग शहर ना केवळ समुद्र किनाऱ्यांमुळे प्रसिद्ध आहे तर त्याला व त्याजवळच्या बऱ्याच गावांना ऐतिहासिक महत्त्वदेखील आहे. अक्षी, नागाव, रेवदंडा, साळाव, काशीद, मुरुड असे अनेक समुद्र किनारे अलिबागच्या जवळपास आहेत. यापैकी बरेचसे स्वच्छ व सुरक्षित म्हणून प्रसिद्ध आहेत.

वाळू असलेले आणि थोडेसे खडकाळ असे दोन्ही तऱ्हेचे किनारे येथे आहेत. पक्ष्यांच्या बऱ्याच प्रजाती येथे हिवाळ्यात स्थलांतरित होतात. साधारणपणे ऑक्टोबरच्या सुरुवातीस येणारे हे हवाई दूत जवळजवळ एप्रिलपर्यंत याच किनाऱ्यावर विसावलेले असतात. त्यानंतर त्यांची परतीच्या दिशेने वाटचाल सुरु होते.

वेगवेगळ्या प्रकारचे गल्स, टर्न्स, बगळ्यांच्या काही जाती असे कितीतरी प्रकारचे पक्षी हिवाळ्याच्या सुरुवातीसच इथे येतात. या किनाऱ्यांवरील त्यांचे वास्तव्य म्हणजे पक्षिनिरीक्षकांना एक मोठी पर्वणी असते.

अलिबाग जवळच्या किनाऱ्यांवर येणाऱ्या अश्या पक्ष्यांविषयी संशोधन करण्यासाठी लेखिकेला एका प्रकल्पासाठी विश्वविद्यालय अनुदान आयोगाकडून आर्थिक सहाय्य मिळाले होते. त्या संशोधनादरम्यान दिसलेल्या किनारी पक्ष्यांविषयी थोडेसे जाणून घेऊया.

**१. गल्स :**

नोव्हेंबरनंतर अलिबागजवळील समुद्रकिनाऱ्यास भेट दिल्यास पिवळी, केशरी, काळी चोच असलेले शेकडो मध्यम आकाराचे पक्षी आपल्यास पाहायला मिळतात. त्यापैकी बहुतेक वेगवेगळ्या प्रकारचे गल्स असतात. या पक्ष्यांचे प्रमुख अन्न लहान मासे, काही खेकड्याच्या जातीतील प्राणी आणि मृदुकाय प्राणी असते. या समुद्रकिनाऱ्यावर हे खाद्य पदार्थ मुबलक असल्यामुळे, हिवाळ्यामध्ये येथे गल्स स्थलांतर करतात. ते जवळजवळ मार्च महिन्याच्या समाप्तीपर्यंत येथेच राहतात आणि नंतर त्यांच्या प्रजनन प्रदेशात ताजिकिस्तान, किर्गिझस्तान, भारतातील जम्मू काश्मीर व चीनमधील झिंजियांग, पश्चिम तिबेट येथे परत जातात. हिवाळ्यात इथे येणाऱ्यांपैकी अनेक पक्षी जन्मानंतर थोडीशी वाढ झालेले अशा

अवस्थेत असतात. हे छोटे छोटे पक्षी कित्येक मैलांचे अंतर पार करून इकडच्या किनाऱ्यावर येतात. येथील मुबलक प्रमाणात मिळणारे अन्न ग्रहण करून वाढतात व प्रौढ अवस्थेत त्यांच्या जननास योग्य त्या प्रदेशात परत जातात. अशा प्रकारे भारतात येणाऱ्या अनेक जातीच्या गल्सपैकी अलिबाग जवळच्या आक्षी, रेवदंडा, साळाव सारख्या किनाऱ्यांवर ब्लॅक हेडेड व ब्राउन हेडेड गल्स, पलास गल, ह्यूजलिन गल, स्टेप्पी गल या मुख्य प्रजाती मोठ्या संख्येने आढळून येतात. त्यांची येथील किनाऱ्यावरील हालचाल, त्यांचे उडणे इत्यादीचे निरीक्षण करणे म्हणजे एक पर्वणी असते.

**२. टर्न्स :** लाल किंवा केशरी रंगाची चोच असलेले, काळ्या, करड्या व पांढऱ्या रंगसंगतीचे मोठ्या संख्येने दिसणारे दुसरे पक्षी म्हणजे टर्न्स. मध्य-पूर्व आशिया तसेच उत्तर गोलार्धात प्रजनन करणारे काही टर्न प्रजातीचे पक्षी थंडीमध्ये दक्षिण आशियाई प्रदेशांत पोहोचतात. हिवाळा ऋतूत छोटे मासे, कीटक व खेकड्याच्या जातीतील छोटे प्राणी हे याचे मुख्य अन्न आहे. यामुळेच हे पक्षी हिवाळ्यात अलिबागजवळ आढळतात जिथे या पक्ष्यांचे अन्न मुबलक प्रमाणात असते. येथे मुख्यतः आढळणाऱ्या टर्नच्या प्रजाती म्हणजे कॅस्पियन टर्न, गल बिल्ड टर्न, व्हिस्कर्ड टर्न, ग्रेटर क्रेस्टेड टर्न या आहेत. यातील ग्रेटर क्रेस्टेड टर्न तर महाराष्ट्राच्या समुद्री प्रदेशात असलेल्या वेंगुर्ला बेटावरच वीण करतो.

**३. रडी टर्नस्टोन :** छोटासा सुमारे २५ सेमी लांब असलेला समुद्र किनाऱ्यावर आढळणारा हा पक्षी. आक्षीला खडकाळ किनाऱ्यावर दिसला. त्या खडकांवरील त्याची डौलदार हालचाल खूपच आकर्षक असते. तपकिरी व काळा रंग वरच्या भागावर असतो व पोटाकडील रंग मात्र पांढरा असतो. छाती काळी असते. लांब अणकुचीदार चोच कीटक-अळ्यांसारखे भक्ष पकडण्यास तयार असते. खरं तर खडकांमधील किडेमकोडे टिपून खाण्याच्या सवयीमुळेच त्याला टर्नस्टोन असे नाव आहे.

**४. प्लव्हर्स :** काळी थोडी लांब चोच, काळ्या, पांढऱ्या व करड्या रंगसंगतीचा हा पक्षी आहे. सायबेरिया ते आशिया असा प्रवास करून भारतात येणारा हा पक्षी मोठ्या संख्येने अलिबागजवळच्या किनाऱ्यांवर दिसतो. येथे छोटे छोटे किडे, खेकड्याच्या व गांडुळाच्या जातीतील प्राणी हे याचे मुख्य अन्न आहे. येथे आढळणाऱ्या स्थलांतरित प्लव्हर्सच्या प्रजाती लेसर सॅण्ड प्लव्हर, ग्रेटर सॅण्ड प्लव्हर, ग्रे प्लव्हर या आहेत. तसेच रिंग्ड प्लव्हर व केंटीश प्लव्हरची भारतात वीण होते.

**५. सँडपायपर :** या किनाऱ्यावरील आणखी एक प्रवासी म्हणजे सँडपायपर. तपकिरी, राखाडी किंवा रेषारेषांची रंगसंगती असलेले असे हे पक्षी. प्रजनन काळात हलका पिसारा व चमकदार रंगात दिसतात. यातील काही जाती प्रजननासाठी युरोप, मध्य आशिया, जपान या देशांमध्ये रहातात व हिवाळ्यात दक्षिण आशिया, आफ्रिका, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया राष्ट्रांमध्ये स्थलांतरित होतात. हे सर्व पक्षी स्थलांतर करून आपल्या देशात येतात. गल पक्ष्यांबरोबरच किनाऱ्यावर दिसतात. पांढऱ्या रंगाच्या गल्सच्या समोर यांची तपकिरी किंवा राखाडी रंग असलेले थवे उठून दिसतात. छोटे मृदुकाय प्राणी व कधीतरी समुद्रावरील वनस्पती हे यांचे अन्न असते. येथे आढळणाऱ्या सॅण्डपायपरच्या प्रजाती म्हणजे मार्श सॅण्डपायपर, टेरेक सॅण्डपायपर, कॉमन सॅण्डपायपर, वूड सॅण्डपायपर, कर्ल्यू सॅण्डपायपर व ब्रॉड बिल्ड सॅण्डपायपर.

**६. इग्रेट्स :** इग्रेट हे सामान्यतः पांढऱ्या रंगाचे काळी किंवा पिवळी चोच असलेले व शेतात किंवा कोणत्याही पाणवठ्याजवळ आढळणारे पक्षी. किडे, अळ्या, छोटे छोटे मासे वगैरे हे यांचे अन्न असते. त्यामुळेच ते समुद्र किनाऱ्यावरही आढळतात. संख्येने खूप जास्त नसतात तरीही थोड्या मोठ्या आकारामुळे आणि लांब मानेमुळे ते उठून दिसतात. हे पक्षी बरेचसे स्थानिक या वर्गात मोडतात. छोटे, माध्यम व मोठे अश्या तीन प्रकारचे इग्रेट्स इथल्या किनाऱ्यांवर दिसतात. ही वर्गवारी त्यांच्या आकारानुसार करण्यात आली आहे. त्यांचे मासे पकडण्यासाठी ध्यान लावून एका पायावर उभे राहणे व मासा दिसताच पटकन पकडणे ही कला बघण्यास प्रेक्षणीय असते.

**७. हेरॉन्स :** हेही सामान्यतः पाणवठ्याजवळ आढळणारे पक्षी आहेत. मातकट तपकिरी रंगाचे पंख, मान, चोच व बाकी पांढरा रंग असलेले पॉन्ड हेरॉन खूप दिसतात. हेही तसे स्थानिकच आहेत. परंतु, नाईट हेरॉन थोडे करड्या, काळ्या व पांढऱ्या रंगसंगतीचे असतात. स्थलांतर करणारे म्हणजे वेस्टर्न रीफ एग्रेट्स व पर्पल हेरॉन हे विशिष्ट ऋतूतच दिसतात.

**८. रेड शॅन्क व ग्रीन शॅन्क :** लहान आकाराचा पक्षी. चोच व पाय लांब असतात. चोचीचा रंग राखाडी व काळा यांचा संयोग असतो.

ग्रीन शॅन्क प्रजननासाठी युरोपमध्ये असतो तर काही रेड शॅन्क आर्क्टिक मध्ये असतात. तेथून ते हिवाळ्यात इकडे येतात. साळाव खाडीकिनारी हे पक्षी मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात.

**९. व्हिम्बरेल :** थोड्या मोठ्या आकाराचा (अंदाजे ३५-४५ सेमी लांबीचा) तपकिरी, राखाडी व पांढऱ्या रंगसंगतीचा हा पक्षी. यातील मुख्य आकर्षण म्हणजे थोडीशी वाकडी वळल्यासारखी चोच. आर्क्टिक, आयर्लंड, ब्रिटन, स्कॉटलंड या देशांमध्ये प्रजनन करणारा हा पक्षी हिवाळ्यात इकडे येतो. खूप मोठ्या संख्येत दिसत नाही. पण दिसल्यावर विसरता येणार नाही इतका सुंदर असतो. प्रजननकाळात छोटे किडे, फुलपाखरे खाणारा हा प्रवासी समुद्र किनाऱ्यावर मात्र छोटे मासे, खेकड्याच्या जातीतील प्राणी इत्यादींवर गुजराण करतो.

**१०. युरेशियन ऑयस्टर कॅचर :** हा तासच्या किनाऱ्यावर दुर्मीळ असलेला पक्षी. पण नियमितपणे जर किनाऱ्यावर येत राहिले तर हिवाळ्यात क्वचित कधीतरी दिसतो. सुमारे ४०-४५ सेमी लांबी, डोके, मान व पंख काळे असून बाकीचे शरीर पांढरे पण चोच आणि पाय मात्र लाल असतात. जरी ऑयस्टर कॅचर नाव असले तरी कालवा व्यतिरिक्त इतर मृदुकाय प्राणी, गांडूळाच्या जातीतील प्राणी हेच याचे अन्न असते. युरोप, ब्रिटन, जर्मनी सारख्या देशात प्रजननासाठी जाणारा हा दूत हिवाळ्यात भारत व इतर दक्षिण आशियाई देशात येतो. या पक्ष्याचे वास्तव्य त्यांच्या अधिवासाच्या निरोगीतेचे द्योतक असते.

येथील काही किनारे अजूनही स्वच्छ आणि नैसर्गिक अवस्थेत आहेत तर काही मुंबई व पुण्यासारख्या जवळपासच्या शहरांमधून येणाऱ्या पर्यटकांमध्ये लोकप्रिय आहेत. पर्यटकांकडून प्रदूषणाचा धोका निर्माण झाला आहे. याउलट पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध किनाऱ्यांवर वेगवेगळ्या क्रीडासामग्री उपलब्ध करून दिल्या जातात. निःसंशयपणे, यामुळे स्थानिकांची सांपत्तिक स्थिती बऱ्याच प्रमाणात सुधारण्यास मदत झाली आहे. कमी किमतीत राहण्याची व्यवस्था, घरगुती तरीही परवडेल अशा दरात शाकाहारी व मांसाहारीअन्न आणि कोकणातील गावाचे वातावरण हे पर्यटकांसाठी एक आकर्षण बनले आहे.

या सर्वाबरोबरच काही अपरिहार्य दुष्परिणाम होत आहेत. नियंत्रण नसलेल्या पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणासारख्या समस्या, प्लास्टिकचा अनिर्बंध वापर, वाहनांमुळे होणारे प्रदूषण या सर्वसामान्य समस्या आहेत. किनाऱ्यावरील जैवविविधतेचा विचार करता वेगळ्याच समस्या नजरेस येतात. किनाऱ्यांवर चालवल्या जाणाऱ्या वाहनांमुळे, समुद्रातच टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे येथील जैवविविधतेस धोका निर्माण होत आहे. किनाऱ्यावरील पक्ष्यांचे खाद्य असलेले मृदुकाय प्राणी वाहनाच्या चाकाखाली व पर्यटकांच्या पायाखाली चिरडले जातात. प्लास्टिकमुळे अनेक समुद्री जीवांस धोका निर्माण होऊ शकतो. शिवाय त्यांचा नैसर्गिक अधिवास नष्ट होऊन त्यांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते.

येथील पर्यटनावर सुयोग्य नियंत्रणाची आवश्यकता आहे, नाहीतर काही काळानंतर सजीवांची विविधता व संख्या कमी होण्याची शक्यता आहे. पर्यटनावर नियंत्रणाबरोबरच पर्यटक व स्थानिकांमध्ये जनजागृतीची गरज आहे. येथील जैव समृद्धी, त्या जीवांचे समुद्र व त्यातील सर्व गोष्टींशी असलेले अवलंबित्व या सर्वच गोष्टींबद्दल लोकांमध्ये सावधानता निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

येथील एकंदर भौगोलिक व जैविक बाबींचा विचार करून समुद्र किनाऱ्याचे पर्यायाने येथे येणाऱ्या पक्ष्यांच्या अधिवासाचे योग्य प्रकारे रक्षण व संवर्धन करणे क्रमप्राप्त आहे ज्यायोगे येथील जैवविविधता पुढील पिढ्यांसाठीही एक आकर्षण राहील.





*****

# चोपड्यात पक्षी संवर्धन उपक्रमाची यशस्विता

## पर्यावरण पूरक वॉटर फीडर्समुळे पक्ष्यांची होतेय तृष्णातृप्ती

दरवर्षी उन्हाळ्यात मार्च ते मे या महिन्यात उन्हाची तीव्रता प्रखर जाणवते. याचा परिणाम पशू-पक्ष्यांवरदेखील होत असतो. अन्नपाण्याची दुर्भिक्ष्यता, विरळ वृक्ष, नैसर्गिक अधिवास नष्ट होणे, प्रखर तापमान यासारख्या गोष्टींमुळे पक्षिजीवन व्यथित होते. पक्षी प्रखर उन्हामुळे व अन्न पाण्याच्या दुर्भीक्ष्यतेमुळे कासावीस होऊन मृत्युमुखी पडतात. अशा परिस्थितीत पक्ष्यांना सहाय्यता करण्यासाठी चोपडा येथील पक्षी अभ्यासक व पक्षी संवर्धक श्री. हेमराज पाटील यांनी प्रतिवर्षाप्रमाणे स्वखर्चाने या वर्षीदेखील २११ मातीची भांडी (परळ) व पर्यावरणपूरक घरटी घरोघरी जाऊन मोफत वितरित केली. सातपुडा निसर्ग संवर्धन संस्थेने हा उपक्रम एप्रिल महिन्यात शहरातील विविध कॉलनी परिसरात घरोघरी जाऊन २११ मातीची भांडी व इको फ्रेंडली नेस्ट्स मोफत देवून राबविला. त्याचबरोबर प्रबोधनात्मक माहितीपत्रकदेखील दिले.

पक्षी संवर्धन उपक्रमाची पडताळणी करण्यासाठी संस्थाप्रमुख श्री. हेमराज पाटील, उपाध्यक्षा सौ अश्विनी पाटील व सदस्य स्वप्नील नेवे यांनी साधारणत: पन्नास परिवारांशी संपर्क साधून माहिती जाणून घेतली. नागरिकांनी उस्फूर्त - सकारात्मक प्रतिक्रियांद्वारे संस्थेच्या उपक्रमाचे तोंड भरुन कौतुक केले. त्याचबरोबर उपक्रम यशस्वितेची अनुभूती कथन केली. नागरिकांनी घराच्या टेरेसवर, कंपाऊंडच्या भिंतींवर, झाडांजवळ वॉटर फीडर्स नियमित भरून ठेवले आहेत. फीडर्स मातीची असल्यामुळे त्यात पाणी अतिशय थंडगार होते. त्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे मंजुळ गायन करणाऱ्या पक्ष्यांचा किलबिलाट दररोज पहाटे ऐकायला येतो, त्याचबरोबर दुपारच्या वेळी तृष्णातृप्ती व धान्य टिपण्यासाठी फीडर्स वर पक्ष्यांची गर्दी झालेली आढळून येते.



## आपल्या माहितीला उजाळा - भाग २

महाराष्ट्र पक्षीमित्र संघाच्या त्रैमासिकेचे प्रायोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख या पर्यंतच मर्यादित राहत नाही. त्या ज्ञानभांडाराची उजळणी करून घेण्यासाठी आपल्या माहितीला उजाळा हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या महितीला उजाळा द्यायचा आहे. प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवतील अशी अपेक्षा आहे. वाचकांनी आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरासोबत पडताळून पाहू शकता. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

## आपल्या माहितीला उजाळा प्रश्नावली

| क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १) | जागतिक वन्यजीव दिन ____ या दिवशी साजरा करतात. | १९२३ मध्ये याच दिवशी 'टाईम' मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला |
| २) | राष्ट्रीय पक्षी मोर जीवशास्त्रीय वर्गीकरणातल्या ___ या कुटुंबात गणला जातो. | Pavo cristatus हे त्याचे शास्त्रीय नाव आहे. |
| ३) | कोणत्या समाजमाध्यमाचे चिन्ह पक्षी आहे. | हे माध्यम अमेरिकेने बनवले आहे. |
| ४) | गटात न बसणारा पक्षी ओळखा -<br>कंठवाला होला, छोटा तपकिरी होला<br>पाचू होला, लालपंखी होला ठिपकेवाला होला | गटात न बसणाऱ्या पक्ष्याच्या जातीचे नाव गौल्ड (Gould) याने ठेवले. |
| ५) | डॉ. सालिम अली यांच्या आत्मवृत्ताचे शीर्षक __ हे आहे. | ती १९८५ साली प्रकाशित झाली. |
| ६) | पक्ष्यांची जीवाश्मासंबंधी अभ्यास करणारी ज्ञानशाखा म्हणजे __ | यामध्ये पक्षी प्रजातींच्या उत्क्रांतीचेही अध्ययन करतात. |
| ७) | ___ हा पश्चिम बंगाल राज्याचा राज्यपक्षी आहे. | हा पक्षी मासेमारीसाठी कुशल आहे. |
| ८) | Caprimulgidae या पक्षी कुटुंबात__ यांचा समावेश होतो. | हे पक्षी निशाचर आहेत. |
| ९) | पक्ष्यांच्या स्थलांतराचा भारतातून असणाऱ्या हवाई मार्गाचे नाव काय? | हा मार्ग आशिया खंडातून जातो. |
| १०) | चित्रातील पक्षीशास्त्रज्ञ ओळखा.  | Handbook of the Birds of India and Pakistan या बहुखंड ग्रंथाचे सहलेखक. |

# येरे येरे पावश्या



**लक्ष्मीकांत नेवे**
8149659353/7588740661
lakshmikant.bird@gmail.com



कसे नाव ठेवलेत माझे,
पुन्हा करा बारसे,
ताप होतो डोक्याला,
मंजुळ आवाजाला तरसे ।।

काय आले दिवस
ऊसाळा नि हिवसाळा,
सदाच मी ओरडू का
कमी करा पावसाळा ।।

पेरते व्हा पेरते व्हा
सुरू करता पेरणी,
नंतर मात्र वाटे
माझा आवाज अळणी ।।

नियती माझी अशी
मागतो तुमची माफी,
दिला आवाज कर्कक्ष
पिलांकडे दुर्लक्ष ।।

काय करावे कळत नाही,
जगण्याशिवाय पर्याय नाही,

*****

## 'पक्षिमित्र' पोहोचला संस्कृतमध्ये

'पक्षिमित्र'च्या जानेवारी २०२१ च्या अंकात श्री. लक्ष्मीकांत नेवे यांनी लिहिलेली 'काकथा' प्रसिद्ध झाली होती. ती वाचल्यावर श्री. जयवंत गायकवाड यांनी श्री. नेवे यांची परवानगी घेऊन त्याचा संस्कृतमधील अनुवाद केरळमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'रसना' या नियतकालिकात प्रसिद्ध केला आहे. श्री. नेवे यांचे अभिनंदन.

*****

## आपल्या माहितीला उजाळा ची उत्तरे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३ मार्च | २. | फासियानीडी Phasianidae | ३. | ट्विटर |
| ४. | पाचू होला. पाचू होला हा Chalcophaps या मूळ जातीत गणला जातो, तर इतर पक्षी Streptopelia मध्ये गणले जातात. | | | | |
| ५. | The Fall of Sparrow | ६. | Paleornithology | ७. | खंड्या (WhiteBreastedKingfisher) |
| ८. | रातवा | ९. | Central -sian Flyways | १०. | Sidney Dillon Ripley |

*****

## पक्ष्यांपासून शिकण्यासारखे

- ✻ ते रात्री काहीही खात नाहीत.
- ✻ रात्री फिरत नाहीत.
- ✻ आपल्या पिलांना स्वत: ट्रेनिंग देतात. दुसऱ्या ठिकाणी पाठवत नाहीत.
- ✻ हावरटासारखे ठोसून कधी खात नाहीत. तुम्ही त्यांच्यापुढे मूठभर दाणे टाका ते थोडे खाऊन उडून जातात. बरोबर घेऊन जात नाहीत.
- ✻ अंधार पडल्यावर झोपून जातात आणि पहाटेच उठून गाणी गात उठतात.
- ✻ ते आपला आहार कधीही बदलत नाहीत.
- ✻ आपल्या जातीतच विवाह करतात. (एकत्र राहतात) बदक आणि हंसाची जोडी कधी होत नाही.
- ✻ आपल्या शरीराकडून सतत काम करवून घेतात. ॲक्टिव्ह ठेवतात. रात्रीशिवाय विश्रांती घेत नाहीत.
- ✻ आजारी पडले तर काही खात नाहीत. बरे झाल्यावरच खातात.
- ✻ आपल्या मुलांवर प्रचंड प्रेम करतात व काळजी घेतात.
- ✻ आपापसात मिळून मिसळून राहतात. अन्नावरून भांडणे झाली तरी परत एकत्र येतात.
- ✻ निसर्ग नियमांचे न कुरकुरता शांतपणे पालन करतात.
- ✻ आपलं घर इको फ्रेंडलीच बनवतात.

## ग्रंथदालन : नवी भर

✻ **अरण्य वाचन :**

लेखक : विश्वास भावे आणि न्यास ट्रस्ट टीम
प्रकाशक : ट्री इम्प्रिंट्स, डोंबिवली (पूर्व)
पृष्ठे : २०८, मूल्य : ३७५ रुपये
निसर्गाच्या शाळेत प्रवेश करण्यापूर्वी अस्सल ओळख करून देणारं हे 'जंगलबुक'.

✻ **जावे किंगफिशर्सच्या गावा**

लेखक : डॉ. पराग नलावडे
प्रकाशक : भरारी प्रकाशन, विलेपार्ले (पूर्व), मुंबई : ४०००५७
पृष्ठ : १५३, मूल्य : ३५० रुपये
भारतात आढळणाऱ्या १२ जातीच्या किंगफिशर्सच्या दर्शनार्थ केलेली पायपीट.

✻✻✻✻✻

## महाराष्ट्र पक्षिमित्र ऑनलाईन व्याख्यानमाला क्र. २

महाराष्ट्र पक्षिमित्र आणि बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांचे तर्फे आयोजित दुसऱ्या ऑनलाईन व्याख्यानमालेमध्ये ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीत आयोजित वेबिनार

| अ क्र | दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | २ ऑगस्ट २०२१ | डॉ. राजू कसंबे, मुंबई | महाराष्ट्रातील पक्ष्यातील स्थलांतर |
| ०२ | ९ ऑगस्ट २०२१ | श्री. गोपाळराव ठोसर, नागपूर | माळढोक : संरक्षण आणि संवर्धन |
| ०३ | १६ऑगस्ट २०२१ | श्री अनिल माळी, नाशिक | गिधाड उपहारगृह : खोरीपाडा, एक यशोगाथा |
| ०४ | २३ ऑगस्ट २०२१ | डॉ. अनिल पिंपळापुरे, नागपूर | मानव आणि पक्षी : सहसबंध |
| ०५ | ३० ऑगस्ट २०२१ | श्री. अमोल सावंत, अकोला | माझे पक्षी अभयारण्य |
| ०६ | १३ सप्टेंबर २०२१ | डॉ. सुजित नरवाडे, BNHS | माळरान परिसंस्था : आणि नष्ट होत चाललेल्या पक्ष्यांचे संवर्धन |
| ०७ | २१ सप्टेंबर २०२१ | प्रा. डॉ. गणेश मर्गज, सावंतवाडी | कोकणातील पक्षी वैभव |
| ०८ | २७ सप्टेंबर २०२१ | डॉ. संजय गायकवाड, नाशिक | पक्षी उपचार आणि शस्त्रक्रिया |

# टपाल तिकिटांच्या दुनियेत
# दयाळ
**Magpie Robin (Copsychus saularis)**

दयाळ हा विरळ जंगलातला पक्षी आहे. आपल्या घराच्या आसपास असलेल्या झाडा झुडपावर एकटाच बसलेला दिसून येतो. अंगणामध्ये पक्ष्यांना पिण्यासाठी ठेवलेल्या भांड्यावर हमखास हजेरी लावतो व आंघोळीचा आनंद घेताना दिसतो.

दयाळाचे डोके, मान, पाठ, कंठ, छाती व पंख चकचकीत काळया रंगाचे असतात. छातीखालचा पोटाचा भाग पांढरा चकचकीत असतो. त्याच्या शेपटीचा रंग काळा असतो व शेपटीखालचा रंग पांढरा असतो. डोळे काळसर तपकिरी व चोच काळी असते. त्याच्या काळया पंखात पांढरा तिरका पट्टा असतो. मादीचा कंठ, छाती व डोके राखी रंगाचे असते. तो जमिनीवरील किडे कीटक खातो, तर कधी सावर व पांगाऱ्याच्या फुलातला मकरंद पितो. मधून रसाळ फळेही हा पक्षी खातो.

दयाळ हा सुस्वर गायक पक्षी म्हणून ओळखला जातो. वसंत ऋतू सुरू झाला की सुंदर आवाजात गायन आपणास ऐकावयास मिळते सूर्योदयापासून सायंकाळपर्यंत अखंडपणे गायन चालू असते. झाडांच्या खोडावरील बिळात, भिंतीतील भोक, नळाचे तोंड, एखादा रिकामा पाईप घरट्यासाठी हा पक्षी निवडतो. गवत, मुळ्या, केस यांचे पदकवजा घरटे बांधतो. मादी त्यात तीन ते पाच फिक्कट निळसर-हिरवी अंडी घालते.

या अशा सुंदर दयाळ पक्ष्याला बांगला देशाचा राष्ट्रीय पक्षी म्हणून मान मिळाला आहे. बांगला देशाच्या टपाल तिकिटावर दयाळ पक्ष्याची प्रतिमा अंकित केली आहे. तसेच बांगला देशाच्या दोन टकाच्या नोटेवरसुद्धा दयाळ पक्षी विराजमान झाला आहे.

**रवींद्र वामनाचार्य,**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

*****






# महाराष्ट्र पक्षीमित्रचे

## आजच सभासद व्हा

आजीवन सभासद शुल्क रु ५००/- + ५००/- (अंक निधी)
आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

### सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी/मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे अमरावती. येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बैंक ऑफ महाराष्ट्र, गाडगे नगर, अमरावती.
खात्याने नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र,
बँक खाते नं. : ६००३६८१२०१७
IFSC Code - MAHB0000639
खात्यात पैसे भरून त्वरीत मेलने कळविणे, तसेच सभासदाचा अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे. सोबत पे-इन स्लीपची झेरॉक्स जोडावी.

३) पत्रव्यवहाराचा पत्ता :- महाराष्ट्र पक्षीमित्र, द्वारा डॉ.गजानन वाघ अरण्यार्पण, ६३ समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४

Email : pakshimitra@gmail.com
Website : www.pakshimitra.org

### त्रैमासिक अंक निधी

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे मुखपत्र त्रैमासिक अंक पक्षीमित्र हा आपण दर तीन महिन्यांनी प्रकाशित करत असतो. या अंकाला छपाई व पोस्टेज मिळून वार्षिक ५५,०००/- ते ६०,०००/-रुपये खर्च येतो. संस्थेचे नियमित उत्पन्न काहीच नाही त्यामुळे हा अंक परवडत नाही, पक्षीमित्र संस्थेच्या व पक्षी संवर्धन संरक्षण कार्यात या अंकाची अत्यंत आवश्यकता आहे. याचसाठी हा अंक असाच चालू ठेवा असे वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले आहे. याच्या खर्चासाठी त्रैमासिक अंक निधी उभा करण्याचे ठरविण्यात आले आहे. आपण सुध्दा या अंकासाठी देणगी देऊन हातभार लावावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या प्रकल्पाला आपण सुद्धा देणगी देऊन हातभार लावावा ही विनंती.

# महाराष्ट्र पक्षीमित्र

(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

## सभासद अर्ज

प्रति,

मा.अध्यक्ष,

महाराष्ट्र पक्षीमित्र

महोदय,

मला महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/२८५/९८/नागपूर या संस्थेचे नियम व उद्दिष्टे मान्य आहेत. मी शपथपूर्वक सांगतो की, मी सर्व नियमांचे कोटेकोरपणे पालन करीन. मी वरील संस्थेचा आजीवन सभासद होऊ इच्छितो. माझा व्यक्तिगत तपशील खालील प्रमाणे आहे.

संपूर्ण नाव : ____________________

संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

फोन नं. ____________ मो. ____________

ई-मेल ____________________

जन्मतारीख : ____________________

शिक्षण : ____________________

नोकरी/व्यवसाय : ____________________

छंद : ____________________

माझी वर्गणी सोबत देत आहे (D.D./Money Order / Core Bank System)

कृपया माझी सभासद म्हणून स्वीकृती व्हावी ही नम्र विनंती.


श्री/श्रीमती यांनी सुचविल्यावरुन सभासदत्व घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| दिनांक | **अध्यक्ष** | आपला |
| **अर्ज मंजूर/नामंजूर** | **महाराष्ट्र पक्षीमित्र** | सही |

**टिप :** सभासद अर्ज आपल्या वेबसाईटवर **''ऑनलाईन''** पध्दतीने सुध्दा भरता येईल

**महाराष्ट्र पक्षीमित्र ला देण्यात येणाऱ्या सर्व देणग्या 80 G अन्वये सवलत पात्र आहेत.**

## ❊ भावपूर्ण श्रद्धांजली ❊



**वैभव देशमुख, वर्धा**

महाराष्ट्र पक्षिमित्रचे आजिवन सभासद आणि बहार नेचर फाऊंडेशन,वर्धा या संस्थेचे नवनियुक्त सचिव वैभव देशमुख यांचे दि. २२ ऑगष्ट २०२१ रोजी दु:खद निधन झाले. अतिशय मनमिळावू आणि निसर्गावर प्रेम करणारा. पक्षिमित्र, अभ्यासू व्यक्तीमत्व आपल्यातून निघून जाणं दु:खद आहे. बहार नेचर फाऊंडेशन व्दारे घेण्यात आलेली व राज्यभर गाजलेल्या शहर पक्षी निवडणुकीत वैभवने प्रचंड मेहनत घेतली होती. बहार नेचर फाऊंडेशनच्या सचिवपदाची जबाबदारी घेतल्यानंतर वैभवने आणखी वैशिष्टपुर्ण कार्य करण्याची तयारी केली होती. मागील रेवदंडा येथील पक्षिमित्र संमेलनात त्यांची उपस्थिती अनेकांना आठवणीत राहील. महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे वैभव यांना भावपुर्ण श्रध्दांजली

**ईश्वर मृतात्म्यास शांती देओ हीच ईश्वरचरणी प्रार्थना**
**।। महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली ।।**




*****

Book Post

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पण समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*

**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक
मुद्रक : ज्ञानपथ प्रिंटर्स अॅन्ड ग्राफिक्स, अमरावती